cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

गणपती बाप्पा मोरया

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–१४६ | सोमवार दि.१६ सप्टेंबर २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये

# मोदी सरकार शेतकऱ्यांच्या विरोधात...!

## केंद्र सरकारच्या शेती विरोधी धोरणावरून शरद पवार यांचा हल्लाबोल



**सिंदखेड राजा । प्रतिनिधी**

**ज्येष्ठ नेते खासदार शरद पवार यांनी केंद्रातील मोदी सरकार आणि राज्य सरकारवर जोरदार टीका केली आहे. मोदी सरकार शेतकऱ्यांच्या विरोधात असून राज्यातील महायुती सरकारने कारखाने, सहकार चळवळीसाठी कोणतेही काही काम केले नाही. युवकांना रोजगाराच्या संधी निर्माण केल्या नाहीत, असा हल्लाबोल शरद पवार यांनी केला आहे. ते रविवारी (दि.१५) धुळ्यातील शिंदखेडा येथील शेतकरी मेळाव्यात बोलत होते.**

### या लोकांच्या डोक्यात सत्तेचा माज

सध्या सत्तेत असणाऱ्या नेत्यांच्या डोक्यामध्ये सत्तेचा माज शिरला आहे. त्यांच्याकडून सत्तेचा गैरवापर सुरु आहे. बाबासाहेबांनी लोकशाहीचा अधिकार दिला. परंतु या लोकांच्या डोक्यात सत्तेचा उन्माद चढला आहे. त्यांना आता खड्ड्यासारखे बाजूला करण्याची वेळ आली आहे. राज्य महाविकास आघाडीच्या हातात द्या, महाराष्ट्राचा चेहरा बदलेला दिसेल, अशी ग्वाही शरद पवार यांनी दिली.

यावेळी शरद पवार यांनी शेतीसह शेतकऱ्यांच्या मुद्द्यावरून महायुतीसह केंद्रावर टीका केली. शरद पवार म्हणाले, दहा वर्षे कृषी मंत्री म्हणून केंद्रात मी काम केले. त्यानंतर आपला देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला. पण आताच्या राज्यकर्त्यांना शेती आणि शेतकऱ्यांशी काही देणं–घेणं नाही. त्यांच्यात आस्था नाही. जोपर्यंत केंद्र आणि राज्य सरकार यांचे शेती विषयक धोरण बदलत नाही. तोपर्यंत शेतकऱ्यांचा विकास होणार नाही. याचे उदाहरण म्हणजे कांदा असल्याचे शरद पवार म्हणाले. कांदा उत्पादक शेतकऱ्याने कष्टाने पिक घेतले. मात्र मोदी सरकारने कांद्याची निर्यातबंदी केली. कांद्याच्या निर्यातीवर शुल्क लादले. त्यामुळे कांद्याला

### पंधराशे रूपये देण्यापेक्षा बहिणीची अब्रू वाचवणे गरजेचे

काही लोक सांगतात आम्ही काम करो ना करू आम्ही आमच्या बहिणींना पंधराशे रुपये दिले. बहिणींचा सन्मान हा या देशांमध्ये प्रत्येकाला आनंद वाटणारा सन्मान आहे. पण आवश्यकता काय? तुम्ही रोजचे वर्तमानपत्र वाचा. महाराष्ट्रामध्ये रोज वर्तमानपत्र उघडल्यानंतर कुठल्यातरी मुलीवर अत्याचार झाला, कुठेतरी बहिणींवर अत्याचार झाला ही बातमी वाचायला मिळते. पंधराशे रुपये ठीक आहे पण पंधराशे रु. पेक्षा आमच्या बहिणीची अब्रू वाचवणे, त्यांना संरक्षण देणे, तिचे रक्षण करण्याची खऱ्या अर्थाने गरज आहे. पण त्याकडे आजच्या सरकारचे लक्ष नाही. लोकांची फसवणूक सुरु असल्याची टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह राज्य सरकारवर केली.

◀◀ पान २ वर

# दिल्लीच्या मुख्यमंत्रीपदी कोणाची वर्णी लागणार?

### केजरीवालांनी राजिनाम्याचे संकेत दिल्यानंतर काही नेत्यांची नावे आघाडीवर

**दिल्ली । वृतसंस्था**

**'मी दोन दिवसांनी दिल्लीच्या मुख्यमंत्री पदाचा राजीनामा देणार आहे'', अशी घोषणा करत अरविंद केजरीवाल पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत. त्यांच्या या घोषणेनंतर आता दिल्लीच्या मुख्यमंत्रीपदी कोणाची वर्णी लागणार याची चर्चा आप च्या वर्तुळात रंगली आहे.**

मी दोन दिवसांनी दिल्लीच्या मुख्यमंत्री पदाचा राजीनामा देणार आहे. जोपर्यंत जनता निकाल देत नाही तोपर्यंत मी मुख्यमंत्र्यांच्या खुर्चीवर बसणार नाही. मी आणि मनीष सिसोदिया जनतेमध्ये जाऊ, अशी घोषणा अरविंद केजरीवाल



यांनी रविवारी केली. दिल्ली विधानसभा विसर्जित होणार नाही, माझ्या जागी दुसरे मुख्यमंत्री असतील, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. आप कार्यालयात कार्यकर्त्यांना संबोधित करताना ते बोलत होते. मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल

◀◀ पान २ वर

# धनगर आरक्षणासाठी राज्य सरकार समिती स्थापन करणार

## मंत्री शंभुराज देसाई यांची माहिती; सह्याद्री अतिथीगृहावरील बैठकीत घेण्यात आला निर्णय

**मुंबई । प्रतिनिधी**

**सकल धनगर समाजाच्या शिष्टमंडळाची मागणी होती की, धनगर आणि धनखड हे एकच आहेत, अशा पद्धतीचा स्वतंत्र जीआर सरकारने काढावा. तो जीआर कशापद्धतीचा असावा, यासाठी तीन वरिष्ठ आयएएस अधिकाऱ्यांची, तसेच त्या समितीबरोबर सकल धनगर समाजाचे जे प्रतिनिधी आज आले होते, त्यापैकी पाच प्रतिनिधी यांची समिती स्थापन करुन त्यांनी हा जीआरचा मसुदा कसा असावा, जीआर काढला तर तो कोर्टात टीकला पाहिजे, या बाबतीत ती समिती लगेचच चार दिवशात बसेल आणि जीआरचा ड्राफ्ट तयार करतील. ॲडव्होकेट जनरल साहेबांचे त्यावर मत घेतले जाईल आणि पुढची कार्यवाही सकारात्मक करण्याचा निर्णय आजच्या बैठकीत झाला, अशी माहिती मंत्री शंभूराज देसाई यांनी यावेळी दिली.**





धनगर समाजाला सध्या एनटी संवर्गातून आरक्षण मिळत आहे. पण देशभरात धनगर समाजाला एसटीमधून आरक्षण मिळत आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील धनगर समाजाला एसटीतून आरक्षण मिळावे यासाठी पंढरपुरात काही आंदोलक उपोषणाला बसले आहेत. त्यांच्या उपोषणाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रविवारी सह्याद्री अतिथीगृहावर सकल धनगर समाजाच्या शिष्टमंडळासोबत बैठक घेतली. या बैठकीला मंत्री शंभूराज देसाई हे देखील उपस्थित होते. या बैठकीत धनगर आरक्षणासाठी एक मोठा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे आगामी काळात धनगर समाजाच्या मागण्या पूर्ण होण्याची

◀◀ पान २ वर

### धनगर आरक्षणाबाबत बैठकीत नेमका निर्णय काय झाला?

सकल धनगर समाजाच्या शिष्टमंडळाची मागणी होती की, धनगर आणि धनखड हे एकच आहेत, अशा पद्धतीचा स्वतंत्र जीआर सरकारने काढावा. तो जीआर कशापद्धतीचा असावा, यासाठी तीन वरिष्ठ आयएएस अधिकाऱ्यांची, तसेच त्या समितीबरोबर सकल धनगर समाजाचे जे प्रतिनिधी आज आले होते, त्यापैकी पाच प्रतिनिधी यांची समिती स्थापन करुन त्यांनी हा जीआरचा मसुदा कसा असावा, जीआर काढला तर तो कोर्टात टीकला पाहिजे, या बाबतीत ती समिती लगेचच चार दिवशात बसेल आणि जीआरचा ड्राफ्ट तयार करतील. ॲडव्होकेट जनरल यांचे त्यावर मत घेतले जाईल आणि पुढची कार्यवाही सकारात्मक करण्याचा निर्णय आजच्या बैठकीत झाला.

# मी २२ वर्ष आमदार राहिलो, मला ८४ हजार पेंशन मिळते

## मोदींना किती मिळणार? सुभाष देसाईंनी सगळच सांगितले

**शिर्डी । प्रतिनिधी**

पेंशन सर्वांना मिळते. कर्मचाऱ्यांना मिळते एवढचं नाही. लोकप्रतिनीधींनाही पेंशन मिळते. मी २२ वर्ष आमदार होतो. १५ वर्ष आणि ७ वर्ष विधानपरिषदेत आमदार होतो. पहिल्या वेळेला बाळासाहेबांनी आशीर्वाद दिला आणि विधानसभेत पाठवले. त्यानंतर उद्धव साहेबांनी पुन्हा पुन्हा संधी दिली. या २२ वर्षात सेवा केली. लोकप्रतिनिधी करतात





ती सेवा आहे, असे सगळेच लोक मानत नाहीत, पण आपण तसे मानुयात. त्यामुळे मला पेंशन चालू झाली. मला ८४ हजार रुपये पेंशन मिळते, असे माजी मंत्री सुभाष देसाई म्हणाले. शिर्डीत पेन्शन धारकांच्या महाधिवेशनात ते बोलत होते.

आपले जनसामन्यांचे लाडके प्रधानमंत्री आहेत. त्यांना मे महिन्यात जनतेने घरी बसवण्याची तयारी केली होती.

◀◀ पान २ वर

# बीड जाळपोळ प्रकरणातील आरोपी गजाआड

### शिवाजीनगर पोलिसांची कारवाई; हर्सुल कारागृहात रवानगी

**बीड । प्रतिनिधी**

एमपीडीए आणि बीड जाळपोळ प्रकरणात गेल्या सात महिन्यापासून पोलिसांना गुंगारा देणाऱ्या आरोपीला पाथर्डी तालुक्यातील मढी येथून ताब्यात घेतले असून त्याची हर्सुल कारागृहात रवानगी करण्यात आली आहे. ही कारवाई शिवाजीनगर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक मारोती खेडकर यांच्या पथकाने केली.

बीड जाळपोळ प्रकरणात निखील गणेश रांजवण (वय–२०) हा आरोपी असून एपीडीए अंतर्गत त्याच्यावर कारवाई करण्यासाठी प्रस्ताव पाठवण्यात आला होता. मात्र तो गेल्या ७ महिन्यापासून पोलिसांना सतत गुंगारा देत होता. शिवाजीनगर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक मारोती खेडकर यांना निखील रांजवण बाबत गुप्त माहिती मिळाली होती.

◀◀ पान २ वर

# पाडळसिंगीजवळ १८ तलवारी जप्त

## गेवराई पोलिसांची कारवाई; एकास अटक

**बीड । प्रतिनिधी**

**हिरापुर येथील एकजण तलवारी घेऊन दुचाकीवर फिरत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पाडळसिंगी जवळील एका हॉटेलमध्ये १८ तलवारीसह एकास ताब्यात घेतल्याची कारवाई गेवराई पोलिसांनी शनिवारी रात्री ११ वा. केली.**



पोलिस अधिक्षक अविनाश बारगळ यांनी पदभार घेतल्यापासून बीड जिल्ह्यात पोलिसांच्या कारवायात मोठी वाढ झाली आहे. हिरापुर येथील भगवान फकिरा पवार (वय ४०) हा शनिवारी आपल्या दुचाकीवरुन बेकायदेशिररित्या १८ तलवारी घेऊन फिरत होता. याची माहिती पोलिस निरीक्षक प्रविणकुमार बांगर यांना मिळताच

◀◀ पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.१४ सप्टेंबर २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू :१.०० क्विंटल | २,६३३ | २,६७१ | २,६५२ |
| ज्वारी/हायब्रिड : ६४.०० क्विंटल | २,०५१ | २,८११ | २,३१० |
| मूग : ४८.५० क्विंटल | ६,१०१ | ८,००० | ७,२४७ |
| तूर : १.०० क्विंटल | ८,५०० | ८,५०० | ८,५०० |
| उडीद : १६२.५० क्विंटल | ४,८०० | ७,२६० | ६,२४३ |
| बाजरी : २७.५० क्विंटल | २,३४० | ३,८७० | २,८५६ |
| मुग : २९.५० क्विंटल | ५,२०१ | ७,७०० | ७,१७९ |
| सोयाबीन:२३९.५० क्विंटल | ४,५०० | ४,७०० | ४,६५० |
| हरभरा: ६.०० क्विंटल | ६,४५० | ७,८९१ | ७,१६२ |

# शेतकऱ्यांनी उत्पन्न वाढीसाठी शेतीबरोबरच पशुपालन या जोडधंद्याकडेही वळावे–धनंजय मुंडे

## परळी तालुक्यातील मोहा व सिरसाळा येथील पशुवैद्यकीय दवाखान्यांचे धनंजय मुंडे यांच्या हस्ते लोकार्पण

## सिरसाळ्यातील शादी खान्याचे लोकार्पण व महिला सभागृहाचे भूमिपूजनही धनंजय मुंडे यांच्या हस्ते संपन्न

**परळी वै. । प्रतिनिधी**

**परळी मतदारसंघात शेतकऱ्यांना उत्पन्न वाढीसाठी आपण मागेल त्याला शेततळे, सिंचन विहिरी या सर्वाधिक मंजूर केलेल्या आहेत. त्याचबरोबर शेतीच्या सोबतीने उत्पन्न वाढीसाठी पशुपालनाकडेही जोडधंदा म्हणून बघणे व पशुपालन करणे गरजेचे असल्याचे मत कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी परळी तालुक्यातील मोहा येथे पशु वैद्यकीय दवाखान्याच्या लोकार्पण प्रसंगी बोलताना व्यक्त केले आहे.**

बीड जिल्ह्यात लंपी आजारावर नियंत्रण असेल किंवा पशुवैद्यकीय





दवाखान्यांना सुविधा मिळवून देण्याचा विषय असेल आपण २५ कोटी पेक्षा जास्त निधी उपलब्ध करून दिलेला असून परळी तालुक्यात सुद्धा सुमारे सहा कोटी पाच लक्ष रुपये इतका निधी आतापर्यंत उपलब्ध करून देण्यात आला आहे. जनावरांच्या सोनोग्राफी व एक्स–रे साठी पशुपालकांना पूर्वी इतर जिल्ह्यांमध्ये जावे लागायचे मात्र आता परळीमध्ये सुद्धा तीन अध्याय सोनोग्राफी मशीन व एक्स–रे मशीन उपलब्ध करून देण्यात आली आहे, असेही पुढे बोलताना धनंजय मुंडे म्हणाले. यावर्षी सोयाबीनला चांगला भाव मिळणार असून परळी विधानसभा मतदारसंघातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना ऊस घालायची देखील अडचण भासू देणार नाही असा शब्द यावेळी धनंजय मुंडे यांनी बोलताना दिला. यावेळी माजी आमदार आर. टी. देशमुख, परळी पंचायत समितीचे उपसभापती विष्णुपंत देशमुख, माऊली तात्या गडदे राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे अध्यक्ष सुशांत पवार, मोहाच्या सरपंच सौ रुक्मिणी शेप, शैलेंद्र पोटभरे, माणिक सातभाई, प्रकाश कावळे, सरपंच दराडे त्याचबरोबर जिल्हा पशु संवर्धन अधिकारी डॉ.विजय देशमुख, डॉ.कदम,

◀◀ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# पोलीसी तपासातील चुकांवर न्यायालय गंभीर

पोलिसांच्या कामकाज पद्धतीवर मुंबई उच्च न्यायालयाकडून केवळ चिंताच नाही तर चांगलीच खरडपट्टी काढली आहे. वेगवेगळ्या गुन्ह्यांच्या तपासाबाबत, त्यातील त्रुटींबाबत, पोलिसांच्या वर्तनाबाबत, आदर्श कार्यपद्धतीबाबत (एसओपी) उच्च न्यायालयाने गेल्या काही दिवसांत झाडाझडती घेतली आहे. न्या. गडकरी आणि न्या. गोखले यांच्या मते अप्रत्यक्षरीत्या आरोपींना मदत होईल, अशा पद्धतीच्या उणिवा पोलीस तपासात आढळून येत आहेत. कमतरतांचे निराकरण करण्याकडे राज्य सरकारच्या पातळीवर पुरेसे गांभीर्य दिसून येत नाही. हा गंभीर प्रकार आहे.

काही दिवसांपूर्वी मुंबई उच्च न्यायालयाचे न्या. अजय गडकरी आणि न्या. नीला गोखले यांच्या खंडपीठाने महिला आणि मुले यांच्याशी संबंधित गुन्ह्यांच्या तपासाबाबत गंभीर निरीक्षणे नोंदविली. त्या आधी न्या. रेवती मोहिते-डेरे आणि न्या. पृथ्वीराज चव्हाण यांच्या खंडपीठानेही पोलिसांच्या कामकाजाबाबत गंभीर प्रश्न उपस्थित केले. सध्याची स्थिती विषद करतानाच न्यायालय म्हणते की, 'हा आमचा संताप आहे. सातत्याने आमच्यासमोर अशी प्रकरणे येत आहेत. ती वरिष्ठांच्या निदर्शनास आणून देणे आवश्यक आहे. सुनावणीसाठी आलेल्या प्रकरणांचा संदर्भ देत न्यायालय म्हणते की, संपूर्ण व्यवस्थेच्या झाडाझडतीची आवश्यकता आहे. व्यवस्थाच ढासळली आहे. १०० पैकी ८० प्रकरणांत तपासच व्यवस्थित झालेला नसेल, तर संपूर्ण व्यवस्थेची पुनर्रचना करण्याची आवश्यकता आहे. सर्वसामान्य नागरिकाला सत्तेत कोणता पक्ष आहे, नेते कोण आहेत, कोणत्या पदावर कोण आहे याचे काही देणेघेणे नसते. कारण त्याला तहसीलदार, जिल्हाधिकारी कचेरी आणि पोलीस ठाणे येथे जो अनुभव येतो तेच सरकार असते. तो अनुभव भीषण असतो. आपले संविधान सर्व नागरिकांना त्यांच्या हक्काचे संरक्षण करण्याची आणि सुरक्षिततेची हमी देते. अशा वेळेला आपली बाजूच ऐकून घेतली जात नाही, म्हणून त्यांना न्यायालयाचे दरवाजे ठोठवावे लागत असतील आणि न्यायासनासमोर पोलीस आणि सरकार यांची झाडाझडती घेतली जात असेल, तर आदर्श राज्यकारभार म्हणजे नेमके काय असते?

असा प्रश्न पडतो. संविधानाने प्रशासनाला स्वतंत्र अधिकार दिले आहेत. संसद, कार्यपालिका आणि न्यायपालिका अशा तिहेरी स्तंभावर उभा असलेला लोकशाहीचा डोलारा एकही स्तंभ निकामी झाला, तर कोसळून पडण्याचा धोका आहे, हे या ठिकाणी असलेल्या विचारवंतांना लक्षात येत नाही म्हणायचे की, आपण आपले काम करावे आणि निमूट राहावे असे ठरवले जात आहे? प्रशासनाने आपले अधिकार अन्य कोणत्याही एका स्तंभाकडे सोपवून डोळे बंद करून घ्यायचे ठरवले, तर जनतेने फक्त कर देण्याचेच काम करणे अपेक्षित आहे का? आज परिस्थिती अशी दिसते आहे की, प्रशासनाने आपले अधिकार लोकप्रतिनिधींकडे सोपविले आहेत. तुम्हीच काय ते करा, भल्या-बुऱ्याची जबाबदारी घ्या. आम्ही आपले पद, त्यामुळे मिळणारा मान-सन्मान' आणि पगार यात खुश राहू असेच जणू ठरविले आहे. आपल्याला विचारल्याशिवाय प्रशासनातली कोणतीही व्यक्ती निर्णय घेत नाही, यात लोकप्रतिनिधींना फार आनंद मिळत असेल, तर भविष्यात यामुळे काय समस्या निर्माण होतील, याचा विचार झाला पाहिजे.

कायदा व सुव्यवस्था सुरळीत ठेवण्याची जबाबदारी केवळ पोलिसांचीच नाही, तर ती प्रशासनाची देखील आहे. म्हणूनच पोलीस दलाचे प्रमुख गृह विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव हे भारतीय प्रशासन सेवेतील अधिकारी आहेत. पोलीस प्रशासनाच्या कामकाजाबाबत मदत करण्यासाठी एक आयपीएस अधिकारी प्रधान सचिव म्हणून त्यांच्या हाताखाली दिला आहे. न्यायालय जर अतिरिक्त मुख्य सचिवांना सतत पाचारण करून त्यांची भूमिका विचारू लागले, तर ही बाब प्रशंसनीय कशी म्हणता येईल? उद्या त्यांना कदाचित असेही विचारले जाईल की, तुम्ही कधी स्वतःहून पोलीस दलाच्या कामकाजाचा आणि जिल्हा, उपविभाग आणि तालुका दंडाधिकारी यांच्या कामकाजाचा आढावा घेतला आहे का, असल्यास त्याचे कार्यवृत्त दाखवा, तर ते त्यांना सादर करता येईल? समजा ते त्यांनी दाखवले आणि न्यायासनाने विचारले की, पोलिसिंगमध्ये ढिगभर चुका होत आहेत, याला केवळ पोलीसच जबाबदार आहेत की अन्य कोणी, यावर त्यांचे काय उत्तर असेल? प्रशासन आणि लोकनियुक्त सरकार यांच्या अडचणींशी सामान्यांना फारसे देणेघेणे नाही. त्यांच्या दृष्टीने ते सारखेच आहेत. या दोघांना जनतेसाठी एक आश्वासक वातावरण असल्याचे दाखवायचे असते. लोकांनी फक्त आमचा प्रोटोकॉल सांभाळावा, बाकी आम्हाला प्रश्न विचारण्याचा त्यांना अधिकार नाही, अशी भूमिका असेल तर न्यायालयासमोर प्रकरणांचे ढिगच वाढत राहतील.

---

# छत्रपती गणेश मंडळ आयोजित विविध स्पर्धा

## गौरी गणपती आरास स्पर्धा,रांगोळी स्पर्धा व वैयक्तिक नृत्य स्पर्धेला उत्तम प्रतिसाद

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**हनुमान नगर येथील छत्रपती गणेश मंडळाच्या वतीने काल विविध स्पर्धा घेण्यात आल्या.त्यामध्ये लक्ष्मी गौरी आरास, रांगोळी व वैयक्तिक नृत्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेत विजेतेपद पटकावणाऱ्या स्पर्धेकांना युवा नेते संकेत राजकिशोर मोदी व पर्यवेक्षक शिक्षक गणेश तौर तसेच लोकनामा न्यूज चे संपादक बालाजी खैरमोडे यांच्या हस्ते पारितोषिक देवून सत्कार करण्यात आला.**

अतिशय सुंदर अशा कार्यक्रमामध्ये रांगोळी स्पर्धेत भाग घेतलैल्या मुलींनी सुरेख आणि सामाजिक संदेश देणारी रांगोळी काढली होती.मुलींवर होणारे अन्याय अत्याचार रोखण्यात आले पाहिजेत असा संदेश संबंधित रांगोळीतून देण्यात आला.तर आरास देख्याव्यात हनुमान नगर येथील महिलांनी लक्ष्मी गौरी पुढे धार्मिक,सामाजिक व सांस्कृतिक आरास देखावा तयार करून उपस्थितांचे लक्ष वेधले होते.तर



वैयक्तिक नृत्य स्पर्धेत ३ ते १४ वयोगटातील मुला मुलींनी गाण्याच्या ठेकावर भन्नाट नृत्य सादरीकरणातून उपस्थित प्रेक्षकांची मने जिंकली. नृत्य स्पर्धा कार्यक्रमाचे उदघाटन शिवसेना उपजिल्हाप्रमुख(शिंदे गट) गजानन मुडेगावकर व शहर प्रमुख ऋषीकेश लोमटे यांच्या हस्ते करण्यात आले होते.तर या कार्यक्रमाचे पर्यवेक्षक म्हणून शिक्षक गणेश तौर यांनी उत्कृष्ट असे काम पाहिले.विजेत्या स्पर्धकांना युवा नेते संकेत राजकिशोर मोदी यांच्या हस्ते पारितोषिके वितरण करण्यात आले.दरम्यान,गणपतीच्या आरतीचा मान केज मतदारसंघाच्या आमदार सौ. नमिता मुंदडा यांना देण्यात आला होता.यावेळी बोलतांना आमदार नमिता मुंदडा यांनी नृत्यकलेत भाग घेतलेल्या मुलींचे विशेष कौतुक केलै.नृत्य सदरील कार्यक्रमाचे सुत्रसंचालन बाळू सारडा यांनी केले तर आभार प्रदर्शन संजय सुर्यवंशी यांनी केले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी छत्रपती गणेश मंडळाचे सर्व पदाधिकारी व सदस्यांनी अथक परिश्रम घेतले.

---

# मतदारसंघातील विविध गणेश मंडळांना आ.क्षीरसागरांनी दिल्या भेटी

## शहरातील व ग्रामीण भागातील बाप्पांची आरती

**बीड । प्रतिनिधी**

**बीड मतदारसंघातील, बीड शहर व ग्रामीण भागातील विविध गणेश मंडळांना आ.संदीप क्षीरसागर यांनी भटी दिल्या तसेच बाप्पांची आरती करून आशीर्वाद घेतले.**

बीड मतदारसंघात सर्वत्र मोठ्या उत्साहात गणेशोत्सव साजरा केला जात आहे. बीड शहर, बीड तालुका व शिरूर का. तालुक्यात गणेश मंडळांकडून वेगवेगळे उपक्रम राबविले जात आहेत. दरम्यान, बीड शहरातील दीपज्योत गणेश मंडळ माळीवेस, शाहूनगर चा राजा गणेश मंडळ कॅनॉल रोड, मोरया गणेश मंडळ पांगरी रोड, गुप्तेश्वर गणेश मंडळ पोस्टमन कॉलनी, क्षत्रिय गणेश मंडळ शाहू नगर, जाणता राजा गणेश मंडळ पुनम गल्ली, वीरशैव गणेश मंडळ, न्यू गणेश मंडळ विठ्ठल मंदिर चौक, पुरंदर गणेश मंडळ, युवाशक्ती गणेश मंडळ संतोषी माता मंदिर, नक्षत्र गणेश मंडळ भक्ती कन्स्ट्रक्शन तसेच ग्रामीण भागातील विघ्नहर्ता गणेश मंडळ खोकरमोहा, श्रीसंत भगवान बाबा गणेश मंडळ खोकरमोहा, शिवछत्रपती गणेश मंडळ



बरगवाडी, रोकडेश्वर गणेश मंडळ खांबा-लिंबा, जय भगवान गणेश मंडळ खांबा-लिंबा, सार्वजनिक गणेश मंडळ घुगेवाडी आदी गणेश आदी मंडळांना बीड विधानसभा मतदारसंघाचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी भेटी दिल्या व बाप्पांची आरती करून आशीर्वाद घेतले. तसेच येथील नागरि व तरूणांशी संवाद साधला.

---

# आमच्या धडावरती आता आमचेच मस्तक...

## प्रसिद्ध वात्रटिकाकार सूर्यकांत डोळसे यांचे आग्रही प्रतिपादन



**पाटोदा। प्रतिनिधी**

**आमच्या धडावरती आता आमचेच मस्तक आहे. प्रत्येकाने अभिमानाने सांगावे,संविधान हेच माझे आवडते पुस्तक आहे.. असे आग्रही प्रतिपादन प्रसिद्ध वात्रटिकाकार व्याख्याते सूर्यकांत डोळसे यांनी शासकीय आयटीआय पाटोदा येथे रविवार दिनांक १५ सप्टेंबर २०२४ रोजी आयोजित संविधान मंदिराच्या ऑनलाइन उद्घाटन सोहळ्याच्या कार्यक्रमात केले.**

रविवारी हा उद्घाटन सोहळा भारताचे उपराष्ट्रपती जगदीप धनकड यांच्या हस्ते ऑनलाईन पार पडला. राज्यात एकाच वेळी ४३४ संविधान मंदिराचा उद्घाटन सोहळा ऑनलाईन पार पडला. यावेळी सूर्यकांत डोळसे प्रमुख मार्गदर्शक व्याख्याते म्हणून बोलत होते. यावेळी झालेल्या कार्यक्रमात व्यासपीठावर नगराध्यकक्षा दिपाली जाधव, कॉम्रेड महादेवराव नागरगोजे आणि आयटीआयचे प्राचार्य विजय बेलेकर यांची उपस्थिती होती. यावेळी पूर्वार्धात झालेल्या कार्यक्रमात मार्गदर्शक व्याख्यानात सूर्यकांत डोळसे यांनी संविधान मंदिराची राज्य सरकारची संकल्पना समजून सांगताना. १९९६ मध्ये छत्तीसगड राज्यातील बुरंगपाल जिल्हा बस्तर येथे उभारण्यात आलेल्या पहिल्या संविधान मंदिराचा इतिहास समोर मांडला. आणि या इतिहासाची आठवण सगळ्याला असली पाहिजे असे प्रतिपादन केले. या संविधान मंदिराच्या कार्यक्रमाचा प्रमुख हेतू डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आणि संविधान लोकांपर्यंत पुन्हा नव्याने रुजले पाहिजे असा असल्याने आपण प्रत्येकाने डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आणि संविधान पुन्हा नव्याने पुन्हा पुन्हा समजून घेतले पाहिजे. यावेळी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे व्यक्तिमत्व आणि विचार समजून सांगताना त्यांनी आपल्या काय होते बाबासाहेब... या मालिका वात्रटिकेमधून बाबासाहेब आंबेडकरांचे जीवन आणि कार्य उपस्थितांसमोर अत्यंत प्रभावीपणे सादर केले.

---

# तीर्थपुरीत पंचमुखी गणपतीचा ४०० ग्रॅम चांदीचा मुकुट चोरट्याने पळाला

**जालना । प्रतिनिधी**

तीर्थपुरी येथील पुरातन पंचमुखी गणपतीचा डोक्यावरील मुकुट चोरट्याने दिवसाढवळ्या मंदिरातून पळवलाची घटना आज दिनांक १५ सप्टेंबर रोजी दुपारच्या सुमारास चोरट्याने मुकुट पळवला येथील पुरातन व ग्रामदैवत असलेल्या पंचमुखी मंदिरातील गणरायाच्या डोक्यावरील चांदीचा मुकुट ४०० ग्रॅम वजनाचा मुकुट चोरट्याने पळवला या घटनेनंतर येथील तीर्थपुरी पोलीस स्टेशन अंतर्गत अज्ञात व्यक्तीवर गुन्हा दाखल करण्यात आला येथील मुकुट चोरी करताना चोरटे



सीसीटी कॅमेरा कैद झाल्याचेही दिसत आहे यामुळे पोलिसांना तपास लावणे सोयस्कर होणार आहे चोरीचा तपास लवकरात लवकर लावण्यात येईल असे पोलीस प्रशासनाकडून सांगण्यात आले.

**शैलेंद्र पवार उपनगराध्यक्ष नगरपंचायत तीर्थपुरी**

पुरातन गणपती ग्रामदैवत असलेल्या पंचमुखी गणपतीचा मुकुट चोरट्याने पळवला आहे याचा तपास संबंधित पोलिसांनी तात्काळ लावावा नसता गणपती विसर्जन करणार नसल्याचा निर्धार येथील शहरातील गणेश भक्तांनी व गावकऱ्यांनी केला आहे

---

# देश म्हणून सर्व श्रेय राज्यघटनेला - उपराष्ट्रपती धनखड

मुंबईः भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार असून भारतीय राज्यघटना ही सर्वार्थाने वैशिष्ट्यपूर्ण आहे. भारतीय राज्यघटनेबाबत नवीन पिढीत जागृतीसाठी संविधान मंदिर नक्कीच प्रेरणादायी ठरेल, असे प्रतिपादन उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी केले. एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय येथे कौशल्य विकास विभागांतर्गत व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय अंतर्गत ४३४ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये 'संविधान मंदिर लोकार्पण सोहळा झाला. यावेळी उपराष्ट्रपती यांच्या पत्नी डॉ. सुदेश धनखड, केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन,उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस नागपूर येथून दूरदश्य संवादप्रणाली व्दारे उपस्थित होते. कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, कौशल्य विकास विभागाचे सचिव गणेश पाटील, विकास आयुक्त प्रदिपकुमार डांगे, कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. अपुर्वा पालकर, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाचे संचालक सतीश सूर्यवंशी उपस्थित होते.

---

# वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकास निधीतील टेंडर विरोधात हायकोर्टात याचिका दाखल-फड

**परळी । प्रतिनिधी**

**राज्य शासनाच्या वतीने बारा ज्योतिर्लिंगापैकी एक असलेल्या परळी येथील वैद्यनाथ मंदिराच्या विकासासाठी व तीर्थक्षेत्र विकासासाठी २८६ कोटी रुपयांचा तीर्थक्षेत्र विकास निधी मंजूर करण्यात आला आहे. या निधीतील स्वागत कमानी व मेरुगिरी पर्वतावरील दुरुस्ती यासाठी सुमारे ५४ कोटी रुपयांचे टेंडर परळी नगर परिषदेने काढले आहेत. परंतु हे टेंडर अंबानी, अदानी सारखे उद्योगपती जरी आले तरी त्यांना टेंडर भरता येऊ नये अशी अवस्था केल्याचा आरोप राजेभाऊ फड यांनी पत्रकारांशी बोलताना केला.हे टेंडर इतरांनाही भरता यावे यासाठी आपण औरंगाबाद हायकोर्टात याचिका दाखल केल्याचेही त्यांनी सांगितले.**

राजाभाऊ फड यांनी त्यांच्या निवासस्थानी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत पुढे बोलताना ते म्हणाले की, वैद्यनाथ तीर्थ क्षेत्र विकास निधी अंतर्गत परळी शहरात येणाऱ्या बाहेरील भाविक भक्तांसाठी १६ कोटी रुपयांच्या कमानी उभारणीचे टेंडर काढण्यात आले आहे. तसेच मेरूगिरी पर्वतावरील दुरुस्ती कामासाठी ४० कोटी रुपयांचे टेंडर परळी नगर परिषदेने काढले आहे. परंतु सदर टेंडर दीक्षित नावाच्या क्लर्क शिवाय कोणालाही भरता येऊ शकत नाही अशी जाणीवपूर्वक व्यवस्था केल्याचेही ते म्हणाले. दरम्यान कृषी मंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री यांच्या जिल्ह्यातच बोगस पिक विम्याची रॅकेट ही मोठ्या प्रमाणात सुरू असल्याचेही फड म्हणाले. या ४० कोटी रुपयांच्या टेंडर विरोधात औरंगाबाद हायकोर्टात याचिका दाखल करण्यात आली असून येत्या १८ सप्टेंबर



रोजी यावर सुनावणी होणार आहे. परळी शहरात गेल्या साडेसात वर्षाच्या काळात ९०० कोटी रुपयांचा निधी आला. परंतु त्यापैकी ४०० कोटी रुपये बोगस कामे करून उचलल्याचा आरोप करताना याविरुद्ध आपण मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करणार असल्याचेही ते म्हणाले. दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटात आपण लवकरच जाहीर प्रवेश करणार असल्याचे राजेभाऊ फड यांनी सांगितले. याबरोबरच कृषीमंत्र्यांच्या बीड जिल्ह्यात बोगस पिक विमा रॅकेट आहे. याप्रकरणी १६ लाखावर गुन्हे दाखल होऊनही अद्याप त्यांना अटक करण्यात आलेली नाही . सर्वसामान्यांच्या हाताला का मिळावे. काम न करता बिले उचलणे बंद झाले पाहिजे. असेच शहरातील इतर गुत्तेदारांनाही काम मिळावे यासाठी आपण विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार साहेबांनी उमेदवारी दिल्यास निवडणूक लढविणार असल्याचे त्यांनी सांगितले. बोगस सातबारा व आठचा उतारा काढून शासकीय जमिनीवर बोगस पिक विमा भरण्याचे रॅकेट बीड जिल्ह्यात सक्रिय आहे. विशेष म्हणजे कृषिमंत्र्याच्या बीड जिल्ह्यात हे रॅकेट चालविले जात असल्याची माहिती यापूर्वीच उघडकीस आले आहे. या प्रकरणातील राज्यातील २४ ऑनलाईन सेवा केंद्रावर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यापैकी १६ ऑनलाईन सेवा केंद्र हे एकट्या बीड जिल्ह्यातील असल्याची माहिती पत्रकार परिषदेत राजाभाऊ फड यांनी दिली. महाराष्ट्राचे कृषिमंत्री दत्ता बीड जिल्ह्याचे पालकमंत्री यांनी २०१२ सली एक भीष्म प्रतिज्ञा केली होती. परळी विधानसभा मतदारसंघातून निवडणुकीत एक ना एक दिवस कमळ चिन्ह मी गायब करून दाखवणारच. आज त्यांनी घेतलेली भीष्मप्रतिज्ञा पूर्ण होती की? अशी परिस्थिती निर्माण झाली असून काहीजण लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे साहेब व त्यांचा वारसा सांगत जनतेला भावनिक करून मत मागत आहेत. याची मला लाज वाटते. असल्याचेही यावेळी पत्रकार परिषदेत राजेभाऊ फड म्हणाले.

---

## पान १वरून...

### मोदी सरकार

भाव मिळाला नाही. सरकारने गहू, तांदूळाच्याबाबतीतही तेच केले. जे पिकवाल त्या धान्यावर, उत्पादनावर निर्यात बंदी करण्याचे धोरण मोदी सरकारचे आहे. मोदी सरकार शेतकरी विरोधी आहे. पण मी दहा वर्ष कृषिमंत्री म्हणून जे काम केले, त्यामुळे तांदूळ पिकवणारा देश म्हणून भारताचा पहिला क्रमांक लागतो.

----------

### धनगर आरक्षणासाठी राज्य

शक्यता आहे. कारण राज्य सरकारने त्या दृष्टीने महत्त्वाचं पाऊल ठेवलं आहे. मंत्री शंभूराज देसाई यांनी 'सह्याद्री'वरील बैठक संपल्यानंतर माध्यमांना प्रतिक्रिया दिली. यावेळी त्यांनी बैठकीत काय ठरले? याबाबतची माहिती दिली. देसाई म्हणाले, पंढरपुरात उपोषणाला बसलेल्या धनगर समाजाच्या आंदोलकांच्या भेटीसाठी मी आणि मंत्री चंद्रकांत पाटील गेलो होतो. आज सुट्टीचा दिवस असतानाही सर्व सिनियर अधिकाऱ्यांची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली, असे मंत्री शंभूराज देसाई म्हणाले. यानंतर बैठकीत नेमकं काय ठरले? याबाबतची माहिती शंभूराज देसाई यांनी दिली. तसेच आपण याबाबत धनगर समाजाच्या शिष्ठमंडळातील पदाधिकाऱ्यांसोबत बोलूनही माहिती घेऊ शकता, असे शंभूराज देसाई यांनी सांगितले. ''जे उपोषणकर्ते पंढरपुरात बसले आहेत, त्यांना राज्य सरकारने विनंती केली आहे की, त्यांनी उपोषण स्थगित करावं. त्यासाठी आम्ही विभागीय आयुक्तांना पाठवले आहे. आम्ही उपोषणाला बसले आहेत त्यांच्याशी तातडीने चर्चा करु आणि त्यांना उपोषण मागे घेण्याची विनंती करु. सरकारने सकारात्मक निर्णय घेतला आहे. तसेच धनगर समाजाच्या बहुतांश मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय घेतला आहे. सरकारने सकारात्मक आश्वासन दिले आहे, अशी प्रतिक्रिया शंभूराज देसाई यांनी दिली.

----------

### पाडळसिंगीजवळ १८

त्यांनी पाडळसिंगी येथील त्रिमुर्ती हॉटेल येथे भगवान पवार यास ३६ हजार रुपये किमतीच्या १८ तलवारीसह ताब्यात घेतले. याप्रकरणी गेवराई पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

--------

### बीड जाळपोळ प्रकरणातील

त्यानुसार संजय वडमारे, रविंद्र आघाव, लिंबाजी महानोर यांनी पाथर्डी तालुक्यातील मढी येथे जावून त्यास ताब्यात घेतले. त्यानंतर त्याची हर्सुल कारागृहात रवानगी करण्यात आली.

----------------

### मी २२ वर्ष आमदार राहिलो,

दोन कुबड्या घेऊन ते उभे राहिले, पण घरी बसले असते तर त्यांना ९० हजार रुपये पेंशन मिळाली असती, असेही सुभाष देसाईंनी सांगितले. सुभाष देसाई म्हणाले, पेन्शन हा प्रत्येकाचा अधिकार आहे. प्रत्येक सरकारी कर्मचारी पूर्ण आयुष्य सेवेत घालवतो. रिटायरमेंट नंतर कुटुंबावर कोणापुढे हात पसरण्याची वेळ येवू नये अशी भावना असते. लोकप्रतिनीधींना देखील पेन्शन मिळते ना ? मी २२ वर्ष मी लोकप्रतिनीधी होतो. मला ८४ हजार पेन्शन मिळते. कोणासमोर हात पसरण्याची गरज पडणार नाही. मिळण्याची हमी शासनाने दिली. सर्व आमदार, खासदार, मंत्री सर्वांनाच पेंशन मिळते.

----------

### दिल्लीच्या मुख्यमंत्रीपदी

म्हणाले, मी दोन दिवसांनी मुख्यमंत्री पदाचा राजीनामा देणार आहे. जोपर्यंत जनता निकाल देत नाही तोपर्यंत मी मुख्यमंत्र्यांच्या खुर्चीवर बसणार नाही. पुढील मुख्यमंत्री निवडण्यासाठी विधिमंडळ पक्षाची बैठक होणार आहे. यामध्ये मुख्यमंत्र्यांबाबत निर्णय घेतला जाईल असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

**हे नेते आघाडीवर...**

दिल्ली मुख्यमंत्रीपदाच्या शर्यतीत आतिशी यांचे नाव आघाडीवर आहे. सध्या त्यांच्याकडे शिक्षण, उच्च शिक्षण, वित्त, नियोजन, सार्वजनिक बांधाकाम, पाणी, वीज, सेवा, दक्षता, जनसंपर्क आदी खाती आहेत. आतिशीसोबत सौरभ भारद्वाजचेही नाव आघाडीवर आहे. सध्या ते आपच्या सरकारमध्ये आरोग्य, शहरी विकास आणि पर्यटन मंत्री आहेत. सौरभ हे पक्षाचे राष्ट्रीय प्रवक्तेही आहेत. दिल्ली सरकारचे मंत्री गोपाल राय यांचेही नाव चर्चेत आहे. कैलाश गेहलोत यांचेही नाव मुख्यमंत्रीपदाच्या शर्यतीत आहे. या यादीत आपचे आमदार कुलदीप कुमार यांचेही नाव आहे. अरविंद केजरीवाल यांच्या पत्नी सुनीता केजरीवाल यांच्याही नावाची चर्चा आहे. दरम्यान, आमदारांची बैठक होणार असून मुख्यमंत्री कोण होणार याबाबत निर्णय घेतला जाईल, असे अरविंद केजरीवाल यांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे आता या बैठकीकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष वेधले आहे.

---------

### शेतकऱ्यांनी उत्पन्न वाढीसाठी शेतीबरोबरच

डॉ.प्रकाश आघाव, गटविकास अधिकारी विठ्ठल नागरगोजे यांसह मोहा व परिसरातील ग्रामस्थ उपस्थित होते. आर टी जिजांनी सांगितले पंडित अण्णा मुंडे व धनंजय मुंडेंच्या कामातील साधर्म्य यावेळी बोलताना माजी आमदार आर टी देशमुख यांनी स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे व स्वर्गीय पंडितांना मुंडे यांच्या कामाच्या पद्धतीवरून धनंजय मुंडे यांच्या कामाच्या पद्धतीशी त्यांचे कसे साधर्म्य आहे याबाबतच्या आठवणी जागे केल्या. मोहा गावातील जिल्हा परिषद शाळा व अन्य काही विकास कामांचे पंडित अण्णांच्या हस्ते काही वर्षांपूर्वी भूमिपूजन झाले व पुढील काही महिन्यात पंडित अण्णांच्या हस्ते त्यांचे लोकार्पणही झाले. त्याच्यात शेजारच्या जागेमध्ये पंडित अण्णांचे सुपुत्र धनंजय मुंडे यांच्या हाताने पशुवैद्यकीय दवाखान्याचे भूमिपूजन झाले व काही महिन्यातच त्याचे लोकार्पणही झाले. या भागात जी काही विकास कामे झाली ती स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे, स्वर्गीय पंडित अण्णा मुंडे तसेच पुढच्या पिढीत धनंजय मुंडे व पंकजाताई मुंडे यांच्या माध्यमातून झाली, असे आर टी देशमुख यावेळी बोलताना म्हणाले.

**सिरसाळ्यातील पशु वैद्यकीय दवाखाना, शादीखान्याचे लोकार्पण व महिला सभागृहाचे भूमिपूजन**

सिरसाळा येथे धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून उभारण्यात आलेल्या पशुवैद्यकीय दवाखान्याचे लोकार्पण श्री मुंडे यांच्या हस्ते संपन्न झाले. तसेच त्यानंतर सिरसाळ्यात उभारण्यात आलेल्या शादी खान्याचे ही लोकार्पण श्री मुंडे यांच्या हस्ते संपन्न झाले, यावेळी शादी खान्याच्या शेजारी उभारण्यात येत असलेल्या महिला भवनाचेही भूमिपूजन करण्यात आले, तसेच हे काम दर्जेदार पद्धतीने निर्धारित वेळेत पूर्ण करून घेण्याच्या सूचना धनंजय मुंडे यांनी संबंधितांना केल्या आहेत. याप्रसंगी वैद्यनाथ कारखान्याचे व्हाईस चेअरमन चंद्रकांत कराड, राजाभाऊ पौळ, जानेमिया कुरेशी, राम किरवले, माणिकराव पौळ, माधवराव नायबळ, वसंत राठोड, फेरोज पठाण, संतोष पांडे, अक्रम पठाण, देवराव काळे, सतिश काळे, नदीम शेख, रफिक बागवान, निहाल मणियार, कल्याण काळे, श्रीराम बडे, अक्षय दळवी, विठ्ठल गित्ते, नय्युम शेख, गटविकास अधिकारी विठ्ठल नागरगोजे, श्री काळे, डॉ.कदम, डॉ.आघाव आदी उपस्थित होते.

------------

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

सोमवार दि. १६ सप्टेंबर २०२४





बीड : शिवसेना जनसंपर्क कार्यालयाच्या गणरायाची आरती शिवसेनेचे बीड जिल्हा सह संपर्क प्रमुख बाळासाहेब अंबुरे यांच्या हस्ते संपन्न झाली. यावेळी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते, उपजिल्हाप्रमुख राजूभाऊ महूवाले, शहर प्रमुख शेख निजाम भाई, युवासेनेचे उपजिल्हाप्रमुख अभिषेक भैय्या दिवे, दिपक घोडके पाटील, विनोद गूंड पाटील, राकेश दादा ढोले उपस्थित होते.

# जाती धर्मात तेढ निर्माण करण्यासाठी समाजात विष पेरण्याचे काम सुरू

## प्रा. कविता म्हेत्रे यांचे उद्‌गार

अंबाजोगाई । प्रतिनिधी

जात धर्म संपुष्टात आणण्याची छत्रपती शिवाजी महाराज, फुले शाहू आंबेडकर यांची लढाई होती मात्र आज जाती धर्मात तेढ कसं निर्मान होईल, माणसात माणूस कसा राहणार नाही या साठी समाजात विष पेरण्याचे कांम सुरू आहे असे उदगार पुरोगामी विचार जागर अभियाना अंतर्गत ‘‘ मी सावित्री जोतीराव फुले‘‘ ह्या नाट्यप्रयोगाच्या सादरकर्त्या, प्रमुख मार्गदर्शक प्रा.कविता म्हेत्रे अंबाजोगाई वासीयांशी संवाद साधत असताना काढले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी ऍड अनंतराव जगतकर यांची उपस्थिती होती तर या प्रसंगी जेष्ठ पत्रकार दत्तात्रय अंबेकर, साहित्यिक विद्याधर पांडे, विश्वांबर वराट, सुरेखा पवार, सौ सुमन घाडगे, चंद्रकांत वडमारे यांच्या सह संयोजक रावसाहेब घाडगे-पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

या वेळी बोलताना प्रा कविता म्हेत्रे म्हणाल्या की समाजाचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रबोधनाच्या माध्यमातून आपला प्रयत्न सुरू असून आज महाराष्ट्रच नव्हे तर देशात बाईला पुरुषांची भीती वाटते आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या काळात



महिलांचा सन्मान होत होता. आज राज्यात महिला, मुली सुरक्षितता नाही. ४ वर्षाच्या लेकरावर बलात्कार होत असेल तर याला शाहू फुले आंबेडकर यांचा महाराष्ट्र म्हणायचं का? असा सवालही या वेळी त्यांनी केला.

५५ वर्षा पूर्वी शरद पवार साहेब आपल्याला एकचं मुलगी होऊ देतात हा फुले शाहू आंबेडकर यांचा विचार असून आज लोकशाहीची व्याख्या बदलली आहे. आज लोकशाही जिवंत नाही. काही लोकांनी काही लोकांसाठी चालवलेले राज्य ही लोकशाही बनली आहे आणि खऱ्या अर्थाने लोकशाहीला सुरुंग लावण्याचे काम कोण करत असेल तर ती जनता आहे. आरक्षणा साठी आपण भांडत सुटल्याने माणसात माणूस राहिलेला नाही. राजकीय पक्षाचे ध्येय सत्तेत जाणे असून सत्तेत येण्यासाठी डोके मोजली जातात तो व्यक्ती कसा आहे, त्याचे चारित्र्य कसे आहे हे पाहिलं जातं नाही. जगात सर्वात सुंदर स्वातंत्र्य आसून त्यासाठी स्त्री ला धाडसी बनवल्या गेलं पाहिजे हे महात्मा फुले यांनी सांगितले आहे. मात्र आज सर्व महापुरुषाना जाती जाती मध्ये बांधून ठेवल्या जात आहे.पहिली बेटी तूप रोटी, दुसरी बोटी कपाळावर अटी असं सर्वत्र म्हंटल्या जाते एकूणच मुलींना नाकारनारी येथील समाज व्यवस्था असून छत्रपती शिवाजी महाराज यांनी जे स्वराज्य उभा केलं ते जिजाऊ माते मुळे त्या साठी मुलींना निर्भीड बनू द्या. तिला भरपूर शिक्षण शिकू द्या. लाडक्या बहिणी साठी ४५ हजार कोटी खर्च केल्या जात असताना १ हजार लेकरं शिक्षणा पासून वंचित आहेत ही खंत त्यांनी या वेळी व्यक्त केली.

महात्मा फुले यांनी समाजसेवे साठी आपल सर्वस्व अर्पण केल. छत्रपती शिवाजी महाराजांनी लढाई करताना कधीही मुहूर्त पाहिला नाही. हा महाराष्ट्र शाहू फुले आंबेडकराचा राहिला आहे का? ज्या शाळा सुरू करण्यासाठी महात्मा फुले यांनी आयुष्य खर्च केलं त्या शाळा बंद करण्याचा घाट घातल्या जात आहे. शिक्षणाची वाट कोण बंद करत असेल तर ही राजकीय व्यवस्था. आदी जातीच्या नावावर शिक्षण नाकारलं जायचं आज पैशाच्या नावावर शिक्षण नाकारल्या जातंय. या कार्यक्रमाचे सूत्र संचलन प्रशांत पवार तर आभार प्रदर्शन रावसाहेब घाडगे यांनी मानले.

# परतुरमध्ये शिकलकरी मोहल्ल्यात घरावर गोळीबार

जालना । प्रतिनिधी

नांदेड ते छत्रपती संभाजी नगर रेल्वे मार्गावर लगत असलेली परतुर शहरांमध्ये सोन्यासिंगच्या घरावर गोळीबाराचा व्हिडीओ व्हायरल झालेला असतांना तिघांवर सशस्त्र हल्ल्याचा गुन्हा दाखल ना करण्याऐवजी पोलिसांनी शस्त्रसाठा जप्तीची कारवाई करण्यात आली व तसेच गोळीबार झालेला प्रकार दाबून्याचा प्रयत्न परतुर पोलिसांनी केला आहे. प्रकरणाकडे वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी गांभीर्याने लक्ष देवून संबंधित अधिकाऱ्यांची खातेनिहाय चौकशी करावी, अशी मागणी होत आहे.

शिकलकरी मोहल्ल्यात एका गटाने दुसऱ्याच्या घरावर गावठी



कट्टधातून गोळीबार केल्याने परतुर शहरातील नागरिकांमध्ये घबराटीचे वातावरण पसरले आहे यावेळी परतुर शहर

हादरली आहे. ही घटना शनिवारी दुपारी साडेबारा वाजेच्या सुमारास घडली असून, परतुर पोलिसांनी थातूर-मातूर कारवाई करीत मोठा शस्त्रसाठा जप्त केल्याची प्रेस नोट प्रसिद्ध केली.

याविषयी विश्वसनीय सुत्रांकडून मिळाले ली अधिक माहिती अशी की, सोन्यासिंग प्रेमसिंग ठाकूर आणि करतारसिंग

### पोलिसांची शस्त्रसाठा जप्ती कारवाई

उत्तमसिंग पटवा (दोघे रा. साईनगर, शिकलकरी मोहल्ला, परतुर) यांच्यात गुन्हेगारीतील वर्चस्वावरुन वाद सुरु असून, त्यातूनच काही दिवसांपुर्वी सोन्यासिंगच्या घराला आग लावल्याने त्याचे मोठे नुकसान झाले आहे. यासंदर्भात परतुर पोलिसात तक्रार दाखल करण्यात आल्याचे सांगण्यात येते. या घटनेमुळे त्यांच्यातील वैमनस्य चांगलेच वाढले असून, त्यातूनच आज दुपारी साडेबारा वाजेच्या सुमारास करतारसिंग पटवा, त्याचा भाऊ जॉनीसिंग आणि मुलगा या तिघांपैकी एकाने गावठी कट्टधातून सोन्यासिंगच्या घरावर गोळीबार सुरु केला तर हातात धारधार तलवारी घेतलेले २ जण जिवे मारण्याच्या सोन्यासिंग गच्चीवरील बाथरुममध्ये लपला म्हणून बचावला. यावेळी या तिघा हल्लेखोरांना त्यांच्या बरोबर आलेल्या एकाने रोखल्याने पुढील अनर्थ टळला. दरम्यान, या घटनेची माहिती परतुर शहरात वाऱ्यासारखी पसरल्यानंतर एकच धावपळ उडाली असून, परिसरातील नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. सदरील वाद चोरी दरोडे या प्रकारातून घडला असावे असे बोलल्या जात आहे

# योग केल्याने आयुष्यामध्ये वाढ होते -देवा चित्राल

अंबड । प्रतिनिधी

५ दिवसीय आरोग्य शिबिर निरामय आरोग्य आणि अध्यात्मिक विकास योग एक परिपूर्ण विज्ञान आहे योग परिपूर्ण जीवनशैली आहे त्यामुळे आयुष्यामध्ये वाढ होती असे मत योग तज्ञ देवा चित्राल यांनी मत व्यक्त केले. योग ही एक पूर्ण अध्यात्म विद्या आहे .

योग साधना ही लिंग जाती वर्ग संप्रदाय क्षेत्र आणि भाषा यामध्ये कधीही गुंतून राहिलेली नाही

चिंतक बैरागी अभ्यासी ज्ञानी अज्ञानी ब्रह्मचारी ग्रहस्थ कोणीही याचे सानिध्य प्राप्त करून जीवन उंचऊ शकतात व्यक्तीच्या निर्माण आणि उत्थानामध्येच नाहीतर परिवार समाज राष्ट्र आणि विश्वाच्या कल्याणामध्ये योगाचा खूप मोठा वाटा आहे आणि तो सिद्ध झालेला आहे

योग मानवाला सकारात्मक चिंतनाच्या प्रशस्त मार्गावर आणण्यासाठी एक अद्भुत विद्या आहे जिला हजारो वर्षांपूर्वी भारताच्या प्रज्ञावान ऋषीमुनींनी आत्मसात केलेले होते

आणि आपल्याला या योगाची अनुभूती मिळवून देण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते समाजसेवक योग अभ्यासक प्राकृतिक आहाराचा अभ्यास असणारे अभ्यासू शुद्ध क्रियाचे चिकित्सक रोगमुक्त जीवन जगण्याची उमेद देणारे

अंबडचे देवा चित्राल हे आहे

दि. २५ /९ /२०२४ ते दि. २९/ ९/ २०२४

५ दिवसीय आरोग्य शिबिर निरामय आरोग्य आणि अध्यात्मिक विकास या माध्यमातून अंबड मध्ये योग जुळवून आणलेला आहे तरी सर्वांनी या संधी चा उपयोग घेऊन आपल्या आयुष्यात नकारात्मक ऊर्जेतून सकारात्मक ऊर्जेत रूपांतरित होऊन निरोगी जीवन जगावे.

# पत्रकार दयानंद सोनवणे यांना मारहाण करून खोटा गुन्हा दाखल

## खोटा गुन्हा मागे घेण्यासाठी पाटोदा तहसीलदारांना निवेदन

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील अमळनेर पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध दारू विक्री, जुगार आदीअवैध धंदे मोठ्या प्रमाणात वाढल्याची बातमी लोकनायक चे पत्रकार दयानंद सोनवणे यांनी छापल्याने याचा राग मनात धरून अवैध चालवणारे तुकाराम आतकरे व अशोक वाल्हेकर यांनी डोंगर किन्ही ते मिसाळवाडी रस्त्यावर अश्लील शिवीगाळ करत सोनवणे यांना लाथाबुक्याने मारहाण करून जखमी केले. उलट पोलिसांनी मात्र त्यांच्यावरच गुन्हा दाखल केला या घटनेचा मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने निषेध करण्यात आला असून पाटोदा तहसीलदारांना निवेदन देऊन हा गुन्हा मागे घेण्याची मागणी केली आहे.

तालुक्यातील अमळनेर पोलीस ठाण्याचे हद्दीत अवैध दारू विक्री, मटका जुगार क्लब असे अवैध धंदे मोठ्या प्रमाणात चालू

### पोलीस अधीक्षकांना निवेदन देणार

दयानंद सोनवणे यांच्या मारहाण प्रकरणी मराठी पत्रकार परिषदेच्या जिल्हा शाखेच्या वतीने पोलीस अधीक्षक बारगळ यांना निवेदन देण्यात येणार असून या अवैध धंद्यांचा बंदोबस्त करा आणि दयानंद सोनवणे यांच्यावरील गुन्हा मागे घ्या अशी मागणी करण्यात येणार आहे.

असून त्यामुळे अनेक कुटुंबांची वाताहत झाली आहे. या संदर्भात पत्रकार दयानंद सोनवणे यांनी लोकनायक मध्ये बातमी छापल्याने आणि पोलीस निष्क्रिय असल्याचा यात उल्लेख असल्याने अवैध धंदे करणारे तुकाराम आतकरे व अशोक वाल्हेकर यांनी दयानंद सोनवणे यांना डोंगर किन्ही ते मिसाळवाडी रस्त्यावर गाठून अश्लील भाषेत शिवीगाळ करून, खाली पाडून लाता बुक्क्याने मारहाण केली. यात दयानंद सोनवणे गंभीर जखमी झाले. यासंदर्भात अमळनेर पोलिसात त्यांनी तक्रार दिली. मात्र अवैध धंदेवाल्यांचे या पोलीस ठाण्यावर वर्चस्व असल्याने त्यांना वाचण्यासाठी उलट दयानंद सोनवणे यांनाच पैसे मागतो असा आरोप करत त्याच्यावर गुन्हा नोंद केला. या घटनेचा मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने निषेध करण्यात आला असून दयानंद सोनवणे यांच्यावर खोटा गुन्हा मागे घ्यावा या मागणीसाठी तहसीलदारांना निवेदन देण्यात आले या निवेदनावर सय्यद सज्जाद, हमीद भाई पठाण, गणेश शेवाळे, खंडागळे, अजय जोशी प्रदीप उबाळे, राम तांबे, हरिदास शेलार, शेख जावेदभाई , संजय सानप, भोकरे पीपी ,कादर मकरानी, अशोक भवर सचिन शिंदे, अमीर शेख आदींच्या सह्या आहेत. तहसीलदारां मार्फत हेच निवेदन उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांनाही पाठवण्यात आले आहे.

# सूर्य आणि चंद्र असेपर्यंत भारतीय संविधान बदलणार नाही-डॉ.स्वरूपसिंह हजारी

धारूर । प्रतिनिधी

मंगल प्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून संविधान मंदिर चे आज दिनांक १५/०९/२०२४ रोजी भारताचे उपराष्ट्रपती मा. जगदीप धनखड यांच्या हस्ते आभासी पद्धतीने शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था धारूर येथे संविधान मंदिर चे उद्घाटन झाले. या प्रसंगी डॉ. स्वरूपसिह हजारी आणि बाळासाहेब गायकवाड यांच्या हस्ते प्रत्यक्षात संविधान मंदिराचे उद्घाटन करण्यात आले.

आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. स्वरूपसिह हजारी यांनी सूर्य आणि चंद्र असे पर्यन्त भारतीय संविधान बदलणार नाही या विधानाने त्यांनी संविधानाच्या स्थैर्याची आणि कालातीत महत्वाची जाणीव करून दिली. तसेच संविधानाने दिलेल्या मौलिक अधिकारामुळेच प्रत्येक भारतीय नागरिकाला समान



न्याय, स्वातंत्र्य आणि प्रतिष्ठा मिळते या वर भर दिला. डॉ. बाबासाहेबांनी संविधानच्या माध्यमातून समाजातील दुर्बल, उपेक्षित आणि शोषित वर्गाच्या न्यायासाठी विशेष व्यवस्था केली. त्यांनी एक असा समाज निर्माण करण्याचा प्रयत्न केला जिथे समानतेचे मूल्य जपले जाईल. ‘‘समानता ही एक आदर्श कल्पना नाही तर लोकशाहीची खरी कसोटी आहे‘‘ असे बाबासाहेबांचे मत होते असे त्यांनी आपल्या भाषणात स्पष्ट केले.

श्री बाळासाहेब गायकवाड यांनी भारतीय संविधान निर्मिती बाबतची माहिती देऊन भारतीय संविधान हा फक्त कायद्यांचा संच नसून देशातील विविधता, एकात्मता, आणि समृद्ध परंपरेचा आदर करणारा एक जीवंत दस्तावेज असून भारतात न्याय, समता, स्वातंत्र्यता आणि बंधुता या चार मूलभूत तत्वावर आधारित समाज निर्माण करण्याचे उदिष्ट ठरवले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान निर्माण करण्याचे कार्य हे भारतीय ईतिहासातील सुवर्णकाळ होता. त्यांचा विचारांचा आणि संविधानाचा सन्मान करणे म्हणजेच आपण एक आदर्श समाजाची उभारणी करण्याचादिशेने पाऊल टाकत आहोत असे प्रतिपादन त्यांनी केले

या प्रसंगी सूत्र संचालन निशा पांडे यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री कुलवंत काळुंके यांनी केले. या प्रसंगी श्री आकाश गायसमुद्रे - वंचित बहुजन आघाडी शहर अध्यक्ष, जनता विद्यालयाचे श्री गुळवे सर उपस्थित होते तर या कार्यक्रम करिता औ. प्र संस्थे चे प्राचार्य श्री बेलेकर व्हि. एस. यांच्या मार्गदर्शना खाली कर्मचारी श्री शेख. जे. यू. सौ खंदाडे एस. जी, श्री शेलगावकर पी. एच. श्री वावळे ए. पी. श्री पौळ के. ए. मो. फाजील शेख हादी यांनी परिश्रम घेतले.

पान ६ वरून...

## संस्थेला आशादायक भविष्याकडे

पन्नास वर्षे पूर्ण करून सुवर्ण महोत्सव साजरा करते यामागे त्या संस्थेच्या कार्याची उंची सिद्ध होते सध्या फक्त ऍलोपॅथीच नव्हे तर आता आयुर्वेद आणि होमिओपॅथी सुद्धा गरजेची बंदी आहे होमिओपॅथीला ऍलोपॅथीची जोड ठेवून जर उपचार सुरू ठेवले तर नक्कीच होमिओपॅथी क्षेत्राला चांगले दिवस येतील असे ते म्हणाले, यावेळी कुलगुरू डॉक्टर पिनांकिन त्रिवेदी म्हणाले की, बीड सारख्या ठिकाणी मेडिकल कॉलेज सुरू करून स्वर्गीय काकू आणि माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी सामान्य विद्यार्थ्याला उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून दिल्या आहेत,याच महाविद्यालयातून आज देशभरात नामवंत डॉक्टर विस्तारित झाले आहेत अनेक विद्यार्थी उच्चपदस्थ म्हणून काम करत आहेत, देशभरात साडेतीन लाख होमिओपॅथी डॉक्टर प्रॅक्टिस करत असून ४५ होमिओपॅथी कॉलेज असून दरवर्षी पंधरा हजार विद्यार्थी डॉक्टर म्हणून बाहेर पडतात त्यामुळे या विद्यार्थ्यांच्या भविष्याचा नक्कीच विचार व्हायला हवा असे सांगून त्यांनी सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथी मेडिकल कॉलेजला सुवर्ण महोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या

यावेळी बीड येथील माजी विद्यार्थ्यांनी डॉ अरुण भस्मे यांना सन्मानपत्र देऊन त्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला,यावेळी

यावेळी बोलताना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की,आज एस के एच मेडिकल कॉलेजला पन्नास वर्षे पूर्ण झाले आहेत ज्या मातृसंस्थेतून शिक्षण घेऊन पुढचा प्रवास सुरू केला आहे अशी सर्व मंडळी आज एकत्र आली आहेत या सुवर्ण महोत्सवाला देशभरातून मान्यवरांनी उपस्थिती दिली त्याबद्दल मी सर्वांचा आभारी आहे स्वर्गीय काकूंनी मेडिकल कॉलेज प्रगतीपथावर नेले अनेक अडचणी आणि स्पीड ब्रेकर आले मात्र काकूंनी न डगमगता संस्थेची वाटचाल सुरूच ठेवली अनेक जण टीका करत होते साबुदाण्याच्या गोळ्या वाटून कुनाचे भले झाले का? किंवा रुग्ण बरा होतो का? पण आज त्याच गोळ्या चमत्कार घडू लागले आहेत कोरोना काळात आर्सेनिक नावाचे औषध आम्हाला आधार देणारे ठरले सगळ्या सीमा गळून पडल्या आहेत आता करलो दुनिया मुठी मे असे युग आहे जगाचा कारभार हातात दिसू लागला आहे विज्ञानाने भरभराटी घेतली आहे नवनवीन तंत्रज्ञान विकसित होत आहे आज सुवर्ण महोत्सव साजरा करताना आपण सर्वांनी प्रगतीच्या वाटेवर चालत जाऊया निवडणुका जरी असल्या तरी ही संस्था माझ्यासाठी खूप महत्त्वाची आहे हेच तर माझे खरे भांडवल आहे सत्ता पदे येतात आणि जातात पण माझी ही संस्था कायम माझ्याबरोबर आहे हे माझे भाग्य समजतो,आपण पुढील वर्षाकडे पाहत असताना, आपण या पन्नास वर्षात ज्यांनी साथ दिली त्यांचा यथोचित सन्मान, त्याचबरोबर सुवर्ण महोत्सवाचा उत्सव आणि आणि पुढील अमृत महोत्स वाच्या दृष्टीने संस्था अधिक बळकट होईल तिचा विस्तार होईल या दृष्टीने वेगवेगळ्या आयडिया किंवा कल्पना राबविण्याकडे लक्ष देऊ या.

सुवर्णमहोत्सवी वर्ष हे संपूर्ण महाविद्यालयीन समुदायासाठी एकत्र येण्याची आणि संस्थेच्या अर्धशतकातील उल्लेखनीय कामगिरीचा उत्सव साजरा करण्याची एक अद्भुत संधी आहे. आपल्या संस्मरणीय इतिहासाकडे मागे वळून पाहता, संस्थेने आपल्या संधींचा पुरेपूर उपयोग केला आहे. संस्थेला आशादायक भविष्याकडे नेण्यासाठी सर्व संबंधितांनी नव्याने प्रयत्न करण्याची वेळ आली आहे,अशावेळी काहीतरी वेगळी थीम घेऊन यावर्षी आपण काम करावे आपल्या आगामी सर्व प्रयत्नांमध्ये आजचा दिवस सुवर्ण अक्षराने लिहिलेला गेला आहे संस्थेच्या पुढील काळात भरभराटीसाठी आपण सर्वतोपरी प्रयत्न करूया. आणि संस्थेचे सुवर्णानंतर अमृत महोत्सव शतक शतक व सर्व महोत्सव साजरी व्हावेत यातील महत्त्वाचा हा पन्नास वर्षाचा मैलाचा दगड आहे,सुवर्ण महोत्सव साजरा करत आहोत याच जोमाने कदाचित याहीपेक्षा अधिक गतीने पुढच्या प्रवास सुरू ठेवण्याचा संकल्प आपण सारे मिळून करूया असे माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या,

यावेळी डॉ ओमप्रकाश शेटे यांनी मनोगत व्यक्त करताना, आदर्श शिक्षण संस्था ही नामांकित संस्था म्हणून पुढे आली आहे होमिओपॅथीला राजाश्रय हवा असेल तर शासकीय योजनांमध्ये सहभाग घेणे महत्त्वाचे असल्याचे ते म्हणाले नैसर्गिक उपचाराद्वारे रुग्ण बरा करणे हे आयुर्वेद आणि होमिओपॅथी यांचे काम असून सध्या निवडणुकांचे वातावरण सुरू असतानाही अशा वातावरणात जयदत्त अण्णा आपल्या विद्यार्थ्यांमध्ये सामील होऊन त्यांना शक्ती देत आहेत, बीड जिल्ह्याचे अनेक नेते वैभव आहेत त्यात जयदत्त अण्णांसारखे वैभव सर्वांनी जपायला हवे असे ते म्हणाले यावेळी महाविद्यालयाच्या निमंत्रित माजी विध्यार्थ्यांचे सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले,या सोहळ्यास होमिओपॅथी डॉक्टर,विद्यार्थी,विद्यार्थिनी आणि कर्मचारी तसेच निमंत्रित उपस्थित होते.

पान ६ वरून...

## महाराष्ट्राची सांस्कृतिक परंपरा

राजकिशोर मोदी व संकेत मोदी यांनी घडवून आणली याबाबत संयोजकांचे अभिनंदन करून यापुढील काळात देखील ही स्पर्धा सुरू ठेवून या स्पर्धेस आगामी काळात केवळ शहरपूरतेच मर्यादित न ठेवता ती व्यापक स्वरूपात आयोजित करावी अशी अपेक्षा बिपिन क्षीरसागर यांनी याप्रसंगी व्यक्त केली. महाराष्ट्राची सांस्कृतिक परंपरा असलेली ढोल ताशा वाद्य संस्कृती पुढे नेण्याचे काम प्रियदर्शन क्रीडा मंडळ करत आहे. आजकाल प्राचीन संस्कृती आपणास लोप पावत चालल्याचे दिसून येत आहे. मात्र अशाही परिस्थितीत प्रियदर्शनी क्रीडा मंडळ ही परंपरा जिवंत ठेवण्यासाठी प्रयत्न करत असल्याबद्दल बिपीन क्षीरसागर यांनी त्यांचे अभिनंदन व कौतुक केले. तसेच स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या.

या सहभागी संघातून २१०००/-रुपयाचे प्रथम पारितोषिक तरुण गणेश मंडळ , कुत्तर विहीर या ढोल ताशावाद्य पथकाने पटकावले तर द्वितीय क्रमांक आणि १५०००/- रुपये अंबाजोगाई चा राजा श्री साई गणेश मंडळ परळी वेसच्या ढोल ताशा पथकाने मिळवला. त्याचबरोबर रुपये ११०००/-व तृतीय क्रमांक बाल गणेश मंडळाच्या ढोलताशा पथकास मिळाला. ५००० रूपयांचे उत्तेजनार्थ बक्षीस शहरातील नवयुवक गणेश मंडळाच्या ढोलताशां पथकास देण्यात आले. या सांघिक स्पर्धेबरोबरच वैयक्तिक ढोलवाद्य व वैयक्तिक ताशावाद्य स्पर्धकास देखील स्मृतिचिन्ह व विशेष प्रोत्साहनपर बक्षीस देण्यात आले.सहभागी झालेल्या प्रत्येक मंडळास सहभाग प्रमाणपत्र आणि सन्मानचिन्ह संयोजकांच्या वतीने देण्यात आले. संयोजक संकेत मोदी यांचे सहकारी मित्र दिग्विजय बाळासाहेब सोनवणे यांनी या स्पर्धेत प्रेरित होऊन केवळ मुलींचा संघ असलेला ज्ञानप्रबोधिनी ढोल ताशा वाद्य पथकास ११०००/रुपयांचे रोख पारितोषिक प्रदान केले. प्रियदर्शनी क्रीडा व सांस्कृतिक मंडळाच्या वतीने आयोजित स्पर्धेत विशेष परीक्षक म्हणून लातूर येथील विनायक जोशी , २२ वर्षाचा नृत्य कलेचा अनुभव असलेले नृत्य परिषदेचे मराठवाडा विभाग प्रमुख मयूर राजापुरे, मयूर शेळके, तसेच निलेश पाठक हे उपस्थित होते. ही स्पर्धा संपन्न करण्यासाठी संकेत राजकिशोर मोदी यांच्यासह मयूर लखेरा,सचिन जाधव, दत्ता सरवदे, महेश कदम, विशाल जगताप, शुभम लखेरा,रोहन कुरे,सुरज बजाज, अस्लम शेख,रफिक गवळी, हर्षवर्धन वडमारे, शरद काळे , अश्विन परदेशी, सुशील जोशी, आदित्य लोढा,चेतन मोदी, विशाल भिसे, रोहित देवकर, जतीन कर्णावट,शुभम मोदी, रोहित हुलगुंडे,गौरव कसबे यांच्यासह अनेक तरुणांनी सहकाऱ्यांनी मेहनत घेतली.

## शुभम शेकडे यांची

जाण ठेवून जिद्दीने व चिकाटीने आपले ध्येय डोळे समोर ठेवून अभ्यास करावा व आपल्या सोबतच आपल्या आई-वडिलांचा व गावाचा नावलौकिक करावं इतके प्रयत्न करा की नशिबाची पाने सुद्धा पलटायला वेळ लागत नाही असे शुभम शेकडे यांनी आमचे प्रतिनिधी प्रेम पवळ यांच्याशी बोलताना सांगितले.

## ग्रामीण पोलिसांचे

धाबा,खापरपांगरीतील सुखसागर हॉटेल,सोनेगाव शिवारातील निवांत हॉटेल,म्हसोबा फाट्यावरील रानवारा हॉटेल,महालक्ष्मी चौकातून पोलिसांनी देशी दारूचा मोठा साठा जप्त केला आहे.याशिवाय पारगावमधील एका पान शॉपवरून पेट्रोलच्या ३० बाटल्या ताब्यात घेण्यात आल्या आहेत.दरम्यान रात्रभर सुरु असलेल्या या कारवाईतून जवळपास ४ लाख ५० हजारांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केल्याचे कळते.

## माकपचे नेते कॉम्रेड सिताराम

देशमुख, राजकिशोर मोदी, डॉ. नरेंद्र काळे, मदन परदेशी, ऍड शिवाजी कांबळे, दगडू दादा लोमटे, नानासाहेब गाटाळ, कालिदास आपेट, ऍड अजय बुरांडे,ऍड डिगोळे, ऍड तिडके,विनोद शिंदे, आदित्य कासारे आदींनी आपल्या भावना व्यक्त करून श्रद्धांजली अर्पण केली.या शोकसभेला सुहास चंदनशिव, देविदास जाधव, अनिकेत लोहिया,प्रशांत मस्के,सिद्राम सोळंके सह शहरातील डॉक्टर, वकील,प्राध्यापक,विविध पक्ष संघटनांचे प्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते आधी उपस्थित होते.

## पसायदान सेवा प्रकल्पाच्या

वाढदिवसानिमित्त पसायदान प्रकल्पातील वंचित, बेघर, अनाथ, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांसाठी दोन महिन्याचा किराणा आणि शैक्षणिक साहित्य दिले. यावेळी पसायदानच्या मुलांनी केक कापून सिताराम बडे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी पसायदान सेवा प्रकल्पचे संचालक गोवर्धन दराडे, रंजनाताई दराडे, सागर शिंदे आदि उपस्थित होते.

cmyk

# ३० कोटी रुपयांचा निधी वितरणास मान्यता

## गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना

मुंबई : गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेंतर्गत३० कोटी रुपये निधी वितरित करण्यास कृषी विभागाने मान्यता दिली आहे. याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. राज्यातील शेतकऱ्यांना अपघातात अपंगत्त्व अथवा मृत्यू आल्यास त्यांना भरपाई देण्यासाठी गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेमध्ये सुधारणा करून गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना राबविण्यात येत आहे.

या योजनेअंतर्गत सन २०२४–२५ या आर्थिक वर्षातील मंजूर प्रस्ताव निकाली काढण्यासाठी चालू आर्थिक वर्षामध्ये केलेल्या तरतुदीतून ३० कोटी रुपये इतके अनुदान वितरित करण्यास राज्य शासनाने मान्यता दिली आहे.

राज्यातील शेतकऱ्यांना शेती करताना होणाऱ्या अपघातामुळे अपंगत्व येते तसेच बऱ्याच शेतकऱ्यांचा मृत्यू ओढावतो. अशा अपघातग्रस्त शेतकऱ्यांस/ त्यांच्या कुटुंबास आर्थिक लाभ



देण्यासाठी राज्य शासनाकडून गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजनेत सुधारणा करून गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना राबविण्यात येते.

### अपघात आणि आर्थिक सहाय्य

अपघाती मृत्यृ– रुपये २ लाख. अपघातामुळे दोन डोळे अथवा दोन हात किंवा दोन पाय निकामी होणे– रुपये २ लाख. अपघातामुळे एक डोळा व एक हात किंवा एक पाय निकामी होणे– रुपये २ लाख. अपघातामुळे एक डोळा अथवा एक हात किंवा एक पाय निकामी होणे– रुपये १ लाख

### अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे

७/१२ उतारा. मृत्यूचा दाखला. शेतकऱ्याचे वारस म्हणून गावकामगार तलाठ्याकडील गाव नमुना नं. ६– क नुसार झालेली वारसाची नोंद. शेतकऱ्याच्या वयाच्या पडताळणी करिता शाळा सोडल्याचा दाखला/ आधारकार्ड/ निवडणूक ओळखपत्र. ज्या कागदपत्राआधारे ओळख/ वयाची खात्री होईल असे कोणतेही कागदपत्रे. प्रथम माहिती अहवाल/ स्थळ पंचनामा/ पोलीस पाटील माहिती अहवाल. अपघाताच्या स्वरूपानुसार अंतिम विमा प्रस्तावासोबत सादर करावयाची कागदपत्रे

# नीमस्त्र, ब्रह्मास्त्र आणि अग्निस्त्र, करतात हानिकारक किडींचा अंत



कीड नियंत्रण ही नैसर्गिक आणि सेंद्रिय शेतीत सर्वात मोठी समस्या असते. परंतु काही नैसर्गिक घटकांचा वापर करून शेतकऱ्यांना या किडी आणि रोगांचे नियंत्रण करणे सोपे आहे. फायदेशीर आणि किडींचे नियंत्रण करणारे नीमस्त्र, ब्रह्मास्त्र आणि अग्निस्त्र हे कीटकनाशक व त्यांची उपयुक्तता जाणून घेतल्यास चांगला फायदा होतो.

नीमस्त्र : नीमस्त्र एक कीड नियंत्रक नैसर्गिक काढा आहे. याचा उपयोग पिकावरील रस शोषणाऱ्या किडी/कीटक, पाने पोखरणारी अळी यांच्या नियंत्रणासाठी केला जातो.

तयार करण्याची पद्धती : यासाठी ५ किलो कडुनिंबाची पाने, १०० लिटर पाणी, १ किलो देशी शेण आणि ५ लिटर देशी गोमूत्र आवश्यक आहे. हे सर्व एकत्र एका मोठ्या ड्रममध्ये ठेवावे आणि २ ते ३ मिनिटे ढवळत राहावे. आता या ड्रमचे तोंड सुती कापडाने बांधावे, ४८ तास हे झाकूनच ठेवावे. ४८ तासानंतर कीडनियंत्रक नीमस्त्र तयार होईल. एकदा तयार झाल्यानंतर तुम्ही तुमच्या शेतात ६ महिनेपर्यंत हे नीमस्त्र वापरू शकता. त्याचा वापर करण्यासाठी ५ ते ६ लिटर नीमस्त्र २५० लिटर पाण्यात चांगले मिसळून एक हेक्टर शेतात फवारणी करावी.

अग्नीस्त्र : अग्नीस्त्राचा वापर खोड पोखरणारी अळी, फळ पोखरणाऱ्या अळ्या आणि इतर विविध प्रकारच्या अळ्यांच्या नियंत्रणासाठी करतात.

तयार करण्याची पद्धती : यासाठी सुमारे ५ किलो कडुलिंबाची पाने, अर्धा किलो हिरवी मिरची आणि अर्धा किलो लसूण व २० लिटर गोमुत्र लागेल. या सर्व गोष्टी नीट बारीक करून मिश्रण तयार करायचे आहे. आता या तयार मिश्रणात २० लिटर गोमूत्र मिसळले जाते आणि सुमारे २० मिनिटे उकळले जाते. हे मिश्रण सुमारे ४८ तास ठेवावे आणि त्यानंतर ते सुती कापडाने गाळून ड्रममध्ये ठेवावे. ५ ते ६ लिटर अग्निस्त्र २५० लिटर पाण्यात मिसळून एक हेक्टर क्षेत्रावर फवारणी करावी.

ब्रह्मास्त्र : ब्रह्मास्त्राचा वापर पिकांमधील पोखरणाऱ्या किडी, कीटक आणि अळ्या यांना नियंत्रित करण्यासाठी करतात.

तयार करण्याची पद्धती : यासाठी ३ किलो कडुनिंबाची पाने, २ किलो करंज, २ किलो सीताफळ, २ किलो धतुऱ्याची पाने आणि १० लिटर गोमूत्र लागेल. हे सर्व एकत्र करून मिश्रण तयार करून २० ते २५ मिनिटे उकळावे. ४८ तासांनंतर, हे मिश्रण थंड होऊ द्यावे आणि सूती कापडातून गाळून घ्यावे.५ ते ६ लिटर ब्रह्मास्त्र २५० लिटर पाण्यात मिसळून एक हेक्टर जमिनीवर फवारणीसाठी वापरावे.

# रासायनीक खतांना उत्तम पर्याय हिरवे खत

शेतीमध्ये होणाऱ्या रासायनिक खतांचा वापर यामुळे हल्ली मानवी आरोग्यावर परिणाम होताना दिसून येतो आहे. विशेषतः कर्करोगासारख्या आजारांना सहज निमंत्रण दिले जात आहे. जमिनी देखील सततच्या रासायनिक खतांच्या माऱ्यामुळे आपली सुपीकता गमावून बसल्या आहेत. जमिनीचा पोत खराब होताना दिसून येतो आहे. अलीकडच्या काही वर्षांमध्ये याकडे गंभीर समस्या म्हणून पाहिले जात आहे. आणि यावर उपाय म्हणून सेंद्रिय खताला प्राधान्य दिले जात आहे. मात्र तरीही कमी कालावधीत अधिक पीक घेण्याच्या नादात बहुतांश रासायनिक खतांचा वापर दिसून येतो आहे. रासायनिक खतासाठीचा पर्याय अगदी सहज उपलब्ध असेल तर त्यांचा वापर नक्कीच कमी होवू शकतो. हिरवे खत हा रासायनिक खतांसाठी एक उत्तम पर्याय आहे. ज्यामुळे लागवडीचा खर्चही कमी येतो. आणि पीकही उत्तम आणि अधिक येते. हिरवे खत म्हणजे दुसरे तिसरे काही नाही तर वेगाने वाढणारी पाने असणारी पिके होय. अशी पिके फळ येण्यापूर्वी नांगरणी करून जमिनीत दाबली जातात. हिरव्या खतामुळे जमिनीला नायट्रोजन, फॉस्फरस, पोटॅशियम, जस्त/झिंक, तांबे, मँगनीज आणि लोह इत्यादीचा सहज पुरवठा होतो. रासायनिक खतांसाठीच्या पर्यायामध्ये हिरवे खत सहज उपलब्ध करता येणारे, कमी वेळेचे आणि कमी खर्चिक आहे म्हणायला हरकत नाही. शेण, कंपोस्ट, हिरवे खत इत्यादी सेंद्रिय खतांचा वापर रासायनिक खतांना पर्याय म्हणून करता



येतो. यापैकी हिरवे खत हे सर्वात सोपे आणि उत्तम साधन आहे. हिरव्या खतामुळे प्रामुख्याने जमिनीची गुणवत्ता सुधारते. पर्यायी जलधारण क्षमता वाढते. जमिनीचा पोत सुधारल्यामुळे जमितीतील विविध घटकांसोबत पिकाच्या उत्तम वाढीसाठी आवश्यक सूक्ष्मजीवांच्या संख्येतही वाढ होते. परिणामी जैविक क्रियांची वाढ होते. या खतांमुळे पिकामधील तण वाढत नाही. हिरवे खत तयार करण्यासाठी वेगाने वाढणारी पिके घ्यावी लागतात. या पीकाची लागवड केल्यानंतर ३०–४० दिवसांनी हे खत मातीत घातले जाते. या पिकांची मुळे खोल तसेच पिकामध्ये वातावरणातील नायट्रोजनचे तर्कसंगत करण्याची क्षमता असणारी असणे देखील खूप गरजेचे असते. तसेच या पिकाची पाणी आणि पोषक द्रव्याची मागणी देखील कमी असणे आवश्यक असते.

खत बनविण्याची पद्धत : खत बनविण्याची पद्धत अगदी सोपी आहे. खतासाठी पेरलेले पीक ३०–४० दिवसांनी जमिनीत मिसळायचे. ते मिसळले की १०–१५ किलो युरिया फवारणी करायची ज्यामुळे रोपांचे विघटन लवकर होते. सूक्ष्मजीव त्याचे विघटन करतात. ज्याचा खत म्हणून पिकाला फायदा होतो. अर्थात पेरणी करण्यापूर्वी हिरवे खत मातीत घालायचे असते. हिरवे खत अधिक खोलवर मिसळू नये कारण हे पोषक तत्वांना खूप खोलवर दडपते. शेतात एका विशिष्ट टप्प्यावर पीक पलटी केल्यास तुम्हाला जास्तीत जास्त नायट्रोजनचा फायदा होतो. मसूर, मूग, उडीद, गवार, लोबिया इत्यादी पिके हिरव्या खतासाठी वापरली जातात.

# पाणथळ जमिनीमध्ये अशा करा उपाययोजना

कोणत्याही वनस्पतीच्या वाढीसाठी पाण्याची आवश्यकता असली तरी एका मर्यादेपेक्षा अधिक पाणी झाल्यास त्यात पिकाची वाढ उत्तम होत नाही. वनस्पतींच्या संतुलित वाढीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावणारी जमिनीतील पाणीपातळी ही मातीच्या विविध गुणधर्मांवर परिणाम करते. विशेषतः दीर्घकाळ पाणी साचून राहत असलेल्या जमिनीला मृदा जलसाठण म्हणतात. अशा जमिनीमध्ये हवा खेळती राहत नसल्याने मातीच्या भौतिक, रासायनिक आणि जैविक गुणधर्मांमध्ये खूप बदल होतात. अशा जमिनीत पीक घेणे कठीण होते. या स्थितीत पाण्याचा निचरा योग्य प्रकारे करून घेण्याच्या उपाययोजना राबवाव्या लागतात. त्यातून जमिनीच्या गुणधर्मात आवश्यकतेनुसार बदल करून पीक उत्पादन घेता येते. बहुतांश सर्व वनस्पतींच्या चांगली वाढ आणि उत्पादनासाठी मातीतील कणांच्या पोकळीमध्ये कमाल ७५ टक्के पाणी आणि २५ टक्के हवा भरलेली असणे चांगले मानले जाते. त्यामुळे झाडांची मुळे हवेविना गुदमरत नाहीत.

जमिनीत पाणी साचण्याची प्रमुख कारणे :जमिनीत पाण्याची पातळी जास्त असणे. पावसाचे पाणी कमी असणे. मातीच्या थरात खडक किंवा चिकणमातीचा थर असल्यामुळे पाण्याचा निचरा व्यवस्थित न होणे. चिकणमातीचे अधिक प्रमाण आणि मातीची क्षारता इ. परिस्थितीमुळे पाणी साचण्यास प्रोत्साहन मिळते.

माती पाण्यात मिसळण्याचे प्रकार : अतिवृष्टी किंवा पूरपरिस्थितीमुळे तात्पुरत्या स्वरुपात जमिनीत पाणी साचते. समुद्राचे पाणी आसपासच्या



जमिनीवर पसरून जमिनी पाण्याखाली बुडणे. पावसाळ्यात वाहणारे पावसाचे पाणी जमिनीच्या खोलगट भागामध्ये जमा होत राहते. जमिनीची उंचसखलपणामुळेही पाणी साचण्यास प्रोत्साहन मिळते. पावसाळ्यात भूगर्भातील पाण्याचा उपसा झाल्यामुळे या प्रकारच्या जमिनी जलमय होतात.

माती पाण्यात मिसळण्याचे परिणाम : मातीत पाणी साचल्यामुळे मातीच्या छिद्रांमध्ये असलेली हवा बाहेर पडते. जमिनीतील संपूर्ण पोकळ्या पाण्याने भरतात. हवेची हालचाल रोखली जाते. पाणी सतत स्थिर राहिल्याने माती तयार होण्याची प्रक्रिया मंदावते. परिणामी मातीची घनता वाढत ती कठीण होते. सतत पाण्यात बुडल्याने जमिनीचे तापमान कमी राहते. त्याचा जिवाणूंच्या क्रियांवर परिणाम होतो. त्याचा फटका वनस्पतींना अन्नद्रव्यांच्या उपलब्ध होण्याला बसतो. मातीचा सामू कमी होत जमिनी आम्लयुक्त बनतात. पिकांना नत्र, स्फुरद, पालाश, गंधक आणि जस्त या उपलब्ध अन्नद्रव्यांची कमतरता जाणवते. तर लोह आणि मँगेनीज या अन्नद्रव्यांची अतिरिक्ततेची लक्षणे जाणवतात. पाणी साचल्यामुळे विद्राव्य क्षार, इथिलीन वायू, मिथेन वायू, ब्युटीरिक ॲसिड, सल्फाइड्स, फेरस आयन आणि मँगेनीज आयन असे काही विषारी पदार्थ तयार होतात. ते झाडांकडून उचलले गेल्यामुळे झाडांमध्ये त्यांचे प्रमाण वाढून विषारीपणा वाढू शकते. पाण्याचा योग्य पद्धतीने निचरा केल्यास मुळांच्या परिसरात मोकळी हवा खेळती राहते. परिणामी या घटकांची विषाक्तता कमी होते.

पाणी साठलेल्या जमिनींचे व्यवस्थापन : जमिनीच्या पृष्ठभागाचे सपाटीकरण योग्य पद्धतीने करावे. त्यामुळे जास्त पाणी साचत नाही. झाल्यास निचरा लवकर होतो. अनियंत्रित सिंचनामुळे जमिनीत अतिरिक्त पाणी साठते. हे टाळले पाहिजे. कालव्यातील पाणी गळतीमुळे जमिनीत पाणी साचते. या गळतीवर वेळीच उपाययोजना कराव्यात. पूरग्रस्त भागात बहुतेक शेतीयोग्य जमिनी पाण्याखाली जाऊन पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. म्हणून या भागात बांध टाकून पाण्याचा प्रवाह नियंत्रित केला जाऊ शकतो. अशा शेतामध्ये जास्त पाण्याची आवश्यकता असणाऱ्या झाडांची लागवड करणे. उदा. सॅलिक्स, मूंज गवत, सदाहरित झाडे, शिशम, सफेडा आणि बाभूळ अशा काही झाडांच्या प्रजाती जास्त बाष्पोत्सर्जन करून भूगर्भातील पाणी पातळी कमी करण्यास मदत करतात. अनेक पिके काही प्रमाणात जमिनीतील पाणी साचण्याची स्थिती सहन करू शकतात. पिकाच्या पाणी सहनशीलतेनुसार निवड करता येते. साधारणपणे ओलसर जमिनीत चिकणमाती आणि सेंद्रिय पदार्थांचे प्रमाण जास्त असते. जमिनीतील अतिरिक्त पाण्याचा व्यवस्थित निचरा करण्यासाठी शास्त्रीय पद्धतींचा अवलंब करावा.

# दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६२० : 'मेफ्लॉवर' जहाजाने साउदॅम्पटन बंदरातुन उत्तर अमेरिकेकडे प्रयाण केले.
१८२१ : मैक्सिकोच्या स्वातंत्रतेला मान्यता देण्यात आली होती.
१८६१ : ब्रिटन देशांतील पोस्ट ऑफिस मध्ये बचत खाता उघडण्यास सुरुवात झाली.
१९०८ : 'जनरल मोटर्स कॉर्पोरेशन' या कंपनीची स्थापना झाली.
१९३५ : इंडियन कंपनीज ॲक्ट अन्वये 'बँक ऑफ महाराष्ट्र'ची नोंदणी करण्यात आली.
१९४५ : दुसरे महायुद्ध हाँगकाँगमधील जपानी सैन्याने रॉयल नेव्हीसमोर शरणागती पत्करली
१९६३ : झेरॉक्स ९१४ या प्रतिमुद्रक यंत्राचे पहिले प्रात्यक्षिक.
१९६७ : सोव्हियत संघाने पूर्व कजाख मध्ये आण्विक चाचणी केली.
१९७५ : पापुआ न्यू गिनी या देशाला (ऑस्ट्रेलियापासुन) स्वातंत्र्य मिळाले.
१९८७ : ओझोनच्या थराच्या कमीत कमी संरक्षण करण्यासाठी मॉन्ट्रियल प्रोटोकॉलवर स्वाक्षरी केली आहे.
१९९७ : आय. टी. सी. आंतरराष्ट्रीय मैदानी स्पर्धेत राजीव बालकृष्णन याने शंभर मीटर धावण्याच्या शर्यतीत १०.५० सेकंद वेळ नोंदवून राष्ट्रीय विक्रम केला.
१९९७ : संस्कृत भाषेसंदर्भात प्रशंसनीय कार्य केल्याबद्दल मुंबई येथील मराठा मंदिर संस्थेच्या वरळी हायस्कूलमधील संस्कृतचे निवृत्त शिक्षक पं. गुलाम दस्तगीर अब्बासअली बिराजदार यांना 'राष्ट्रीय संस्कृत पंडित' हा राष्ट्रपतींकडून दिला जाणारा पुरस्कार जाहीर
२००८ : भारतीय हेवी इलेक्ट्रिकल्स लिमिटेड (भेल) च्या कर्मचाऱ्यांना विश्वकर्मा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१३८० : चार्ल्स (सहावा) फ्रान्सचा राजा (मृत्यू: २१ आक्टोबर १४२२)
१३८६ : हेन्री (पाचवा) इंग्लंडचा राजा (मृत्यू: ३१ ऑगस्ट १४२२)
१८५३ : नोबेल पारितोषिक विजेते जर्मन डॉक्टर आल्ब्रेख्त कॉसेल यांचा जन्म.
१८८८ : बेंटले मोटर्स लिमिटेड चे डब्ल्यू ओ. बेंटले यांचा जन्म. (मृत्यू: १३ ऑगस्ट १९७१)
१९०७ : वामनराव सडोलीकर भारतीय हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताच्या जयपूर–अत्रोली घराण्यातील प्रसिद्ध शास्त्रीय गायक (मृत्यू: २५ मार्च १९९१)
१९१३ : कमलाबाई कृष्णाजी ओगले 'रुचिरा' या पाकशास्त्रावरील प्रचंड खपाच्या पुस्तकाच्या लेखिका (मृत्यू: २० एप्रिल १९९९)
१९१६ : एम. एस. सुब्बुलक्ष्मी भारतरत्न, पद्मभूषण, पद्म विभूषण पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय शास्त्रीय कर्नाटकी गायक (मृत्यू: ११ डिसेंबर २००४)
१९२३ : सिंगापूरचे पहिले पंतप्रधान ली कुआन यी यांचा जन्म. (मृत्यू: २३ मार्च २०१५)
१९२५ : आयर्लंडचे पंतप्रधान चार्ल्स हॉगे यांचा जन्म.
१९३१ : भारतीय क्रिकेट पंच आर. रामचंद्र राव यांचा जन्मदिन.
१९४२ : नामदेव धोंडो तथा 'ना. धों' महानोर निसर्ग कवी व प्रयोगशील शेतकरी, त्यांना 'पानझड' या कवितासंग्रहासाठी साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला आहे. १९ व्या मराठवाडा साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. त्यांना पद्मश्री पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.
१९५४ : संजय बंदोपाध्याय भारतातील बंगाली हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतातील प्रख्यात सितार वादक
१९५६ : डेव्हिड कॉपरफिल्ड अमेरिकन जादूगार
१९७१ : भारतीय हिंदी चित्रपट सृष्टीतील प्रसिद्ध गीतकार, पटकथा लेखक व कवी प्रसून जोशी यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६८१ : मुघल शासक दारा शिकोह आणि सम्राट औरंगजेब यांची मोठी बहीण जहाँनारा बेग़म यांचे निधन.
१७३६ : डॅनियल फॅरनहाइट जर्मन शास्त्रज्ञ (जन्म: २४ मे १६८६)
१८२४ : लुई (अठरावा) फ्रान्सचा राजा (जन्म: १७ नोव्हेंबर १७५५)
१९३२ : सर रोनाल्ड रॉस हिवतापाच्या जंतुंचा शोध लावल्याबद्दल नोबेल पारितोषिक मिळवणारे (१९०२) ब्रिटिश डॉक्टर (जन्म: १३ मे १८५७ आल्मोडा, उत्तराखंड)
१९४४ : भारतीय अभियंता व काशी हिंदू महाविद्यालयाचे माजी उप कुलगुरू ज्वालाप्रसाद यांचे निधन.
१९६५ : फ्रेड क्विम्बी अमेरिकन ॲनिमेशनपट निर्माते (जन्म: ३१ जुलै १८८६)
१९६५ : परमवीर चक्र पुरस्कार विजेता भारतीय सैन्य अधिकारी लेफ्टनंट कर्नल ए.बी. तारापोर यांचे निधन.
१९७३ : पुण्यातील जुन्या पिढीतील सरदार, पर्वती संस्थानचे विश्वस्त, संगीतज्ञ, इतिहासाचे अभ्यासक गंगाधरराव नारायणराव तथा आबासाहेब मुजुमदार यांचे निधन. त्यांचे मूळ नाव श्रीधर पांडुरंग प्रभुणे होते. मुजुमदारांकडे ते दत्तक गेले. पुण्याच्या भारत इतिहास संशोधक मंडळाचे ते चोवीस वर्षे चिटणीस होते.
१९७७ : केसरबाई केरकर साहित्य नाटक अकादमी पुरस्कार सन्मानित जयपूर–अतरौली घराण्याच्या भारतीय शास्त्रीय गायिका (जन्म: १३ जुलै १८९२)
१९८४ : बिकीनि चे निर्माते लुई रायर्ड यांचे निधन. (जन्म: १६ सप्टेंबर १९८४)
१९९४ : जयवंत दळवी साहित्यिक, नाटककार व पत्रकार. कथा, कादंबरी, नाटक, प्रवासवर्णन, विनोदी लेख असे विविध प्रकार त्यांनी हाताळले. ते 'ठणठणपाळ' या टोपणनावाने विनोदी व मार्मिक लेखन करीत. (जन्म: १४ ऑगस्ट १९२५)
२००५ : लेसर चे शोधक गॉर्डन गूल्ड यांचे निधन. (जन्म: १७ जुलै १९२०)
२०१२ : आयमॅक्स चे सहसंस्थापक रोमन कोरियटर यांचे निधन. (जन्म: १२ डिसेंबर १९२६)
२०१७ : पद्मविभूषण पुरस्कार सन्मानित भारतीय वायुदलाचे वरिष्ठ अधिकारी मार्शल अर्जन सिंह यांचे निधन.

# सोन्याच्या दिवसांवरुन खा. काळे, आ.गोरंट्याल यांची टोलेबाजी

## सोन्याचा मुलामा दिल्यानंतर जिल्ह्याला सोनियाचे दिवस आले

जालना । प्रतिनिधी

गणेश मंडळाने यंदा चांदीच्या मूर्तीला सोन्याचा मुलावा दिल्यानंतर जिल्ह्याला सोनियाचे दिवस आले आहेत. सर्व गणेश भक्तांची दुःखे, संकटे ,विघ्न दूर व्हावीत आणि प्रत्येकाच्या आयुष्यात सोन्याचे दिवस यावेत अशी प्रार्थना खा. डॉ. कल्याण काळे यांनी विघ्नहर्ता गणरायाच्या चरणी केली. तर सोन्याचे दिवस कोणाचे येतील हा येणारा काळ ठरवेल. असे सूचक विधान करत आ. कैलास गोरंट्याल यांनी आपल्या स्टाईल मध्ये चांगलाच षटकार मारला.



छत्रपती शिवाजी महाराज स्मारका जवळील श्री अनोखा गणेश मंडळातर्फे आयोजित गणेशोत्सवात शनिवारी ( ता. १४) खा. डॉ. कल्याण काळे ,आ. कैलास गोरंट्याल,माजी नगराध्यक्षा सौ. संगीताताई गोरंट्याल, शिवसेना उबाठाचे नेते डॉ. संजय लाखे पाटील यांच्या हस्ते श्रींची महाआरती करण्यात आली. यावेळी गौतमसिंह मुणोत,राम सावंत,राजेंद्र राख,शरद देशमुख,सुनील गोयल, श्रावण भुरेवाल,जीवन सले, हरेश देवावाले,संजय भगत, रमेश गोरक्षक, दुर्गेश काठोठीवाले, राजेंद्र जाधव, मंडळाचे अध्यक्ष अनिल गोयल, योगेश मानधना, संस्थापक अजय ( जगदीश) भरतिया, कार्याध्यक्ष संजय अग्रवाल ( रूपम),धीरेंद्र मेहरा, आशीष जेथलिया,धर्मेंद्र भानुशाली,अनिल लदनिया,राजेश ( पापा) लुणिया,राहुल अग्रवाल,किशोर अग्रवाल, हर्षद चोरडिया, राजेश अग्रवाल ( रूपम),पुरूषोत्तम भक्कड, गौरीशंकर देविदान,जगदीश मुंदडा, राजकुमार दायमा ( सरकार),महेश सारस्वत, गणेश तिवारी, रोहित भुरेवाल,रवी अग्रवाल,आलोक गोरंट्याल,गणेश भुरेवाल, मनोज बंब, सज्जन सकलेचा, सचिन लोढा,महावीर मरलेचा,दीपक पंच, आदींची उपस्थिती होती. मंडळाच्या वतीने मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.तसेच भाविकांना साबुदाणा खिचडी चे वाटप करण्यात आले. हरियाणा येथील सुनील - अनिल तिलकधारी आर्ट्स ग्रुपच्या कलापथकाने भगवान शंकराचे अर्धनारेश्वर रूप, साईबाबांचा दरबार, पाण्यात पेटवलेला दिवा, गंगेचा उगम ,तिच्या भावना, नाग- नागीन नृत्य, जिवंतपणे साकारत भाविकांना वेगळा अनुभव दिला. डम , ,डम,,डमरू बाजे ...., गौराजी के सन्मुख शंकर झुमे, नाचे...,शिर्डीवाले साईबाबा...बंदा गरीब है..., मानो तो मै गंगा हू..., ओम नमः शिवाय,,,तीन शब्द मे सृष्टी का सार समाया ......, या गीतांवर एकापेक्षा एक बहारदार नृत्यांचे सादरीकरण केले. तसेच नाग- नागिन च्या वेशात कलावंतांनी मेरे ढोलना....सून....,छेड मिलन के गीत....! या गीतांवर कसदार अभिनयाने सादरीकरण करून उपस्थितांना मोहित केले. सप्तसुरांच्या तालावर नाग -नागिन यांच्या चित्तथरारक जुगलबंदीला उपस्थितांनी चांगलीच दाद दिली.

# गोवंशमास वाहतूक करणारा पिकअप पाठलाग करुन पकडला

### दिड टन गोमांससह ११ लाख ७५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त




म्हसोबावाडी । प्रतिनिधी

अहमदनगर कडून जामखेड कडे जाणाऱ्या एका पिक अप मध्ये गोवंश मांस भरलेल्याची माहिती मिळाल्यावरुन आष्टी पोलिसांनी माहिजळगाव जामखेड रोडवर खडकत येथे पिक अप पकडला टेम्पोतील तब्बल १५०० किलो गोवंश मास आढळले असून एकूण ११ लाख ७५ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

शनिवारी दि.१४ सप्टेंबर रोजी पहाटेच्या दरम्यान अहमदनगर कडून गोवंश मांस घेऊन एक पिक अप जामखेड मार्गे हैदराबाद येथे जात असल्याची माहिती आष्टी पोलिसांना मिळाली होती. आष्टी पोलिसांनी संशयित टेम्पो माहिजळगाव जामखेड रोडवर खडकत येथे (एमएच.०४ एल ई ०४९७) अडवला. यामध्ये १५०० किलो गोवंश मांस आढळून आले. प्रति किलो २५० प्रमाणे ३ लाख ७५ हजार रुपये व ,एक बंद बॉडी बोलेरो गाडी पिक अप वाहतुकीसाठी वापरली अंदाजे किंमत ८ लाख रुपये असा एकूण ११ लाख ७५ हजार रुपये मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.आष्टी पोलिस ठाण्यात पोह अशोक शिंदे यांच्या फिर्यादीवरून आरोपी इनायत अली शौकत सय्यद वय ५४ वर्षे राहणार तालुका पो.स्टे समोर आंबेडकर चौक अहमदनगर ता.जि.अहमदनगर विरुद्ध महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियमसह कलम ३ (५)बी एन एस २०२३ नुसार आष्टी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.हि कारवाई पोलिस निरीक्षक सोमनाथ जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि. विक्रांत हिंगे, पोलिस उपनिरीक्षक कृष्णा शिंदे,पोलीस हवालदार अशोक शिंदे, पोलीस नाईक प्रवीण क्षिरसागर,पोलीस शिपाई अशोक तांबे, पोलीस शिपाई सय्यद मजर, पोलीस शिपाई भगत आदींनी केली पुढील तपास पोलीस नाईक प्रवीण क्षीरसागर हे करत आहेत.

## थोडक्यात

### गणेश महाराज वारंगे यांचे कीर्तन

बीड । प्रतिनिधी



विसाव्या शतकातील महान संत .किसनबाबा यांच्या २७ व्या वर्षातील पहिल्या पुण्यतिथी भाद्रपद शुद्ध पौर्णिमे निमित्त श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी ता.जि.बीड येथे ह.भ.प. भागवताचार्य गणेश महाराज वारंगे यांचे बुधवार दिनांक १८ सप्टेंबर २०२४ रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत कीर्तन होणार आहे. तरी या किर्तनाचा व महाप्रसादाचा या परिसरातील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडीचे गुरूवर्य शांतीब्रह्म ह.भ.प.नवनाथ महाराज यांची नम्रविनंती व समस्त गावकरी मंडळी मौजवाडी ता. जि.बीड यांच्याकडून महाप्रसादाचे आयोजन केले आहे. तसेच बाबांचा पालखी सोहळा सकाळी आठ वाजता सुरू होईल व गोरक्षनाथ टेकडी येथे गर्भांद्री पर्वत प्रदक्षिणामध्ये सकाळी ९ ते १० यावेळेत सहभागी होता येईल.

### खड्डे बुजवून पथदिवे तत्काळ सुरू करा-चाऊस

माजलगाव । प्रतिनिधी



बीड जिल्ह्यातील रस्त्यांची अवस्था दयनीय झाली असून रस्त्यावर प्रचंड मोठे खड्डे निर्माण झाले असून येत्या दोन दिवसात गणपती विसर्जन आणि ईद-ए-मिलाद हे धार्मिक कार्यक्रम असल्यामुळे हजारो लोक रस्त्यावर येत असल्याकारणाने जिल्ह्यातील गणपती विसर्जन व ईद ए मिलाद सणानिमित्त जिल्हाधिकारी व संबंधित प्रशासनाने रस्त्यांवरील खड्डे बुजून जिल्ह्यातील सर्व शहरातील पथदिवे तात्काळ सुरू करावेत व नागरिकांची होणारी गैरसोय थांबवून नागरिकांना चांगली सेवा देण्याचा प्रयत्न करावा अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे बीड जिल्हा उपाध्यक्ष तथा अल्पसंख्यांक जिल्हा कार्याध्यक्ष तथा मौलाना आझाद युवा मंचचे जिल्हाध्यक्ष नुमान अली चाऊस यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.

### शिक्षणाधिकाऱ्यांना काळे फासणार- मनोज फरके

माजलगाव । प्रतिनिधी



मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत तालुक्यामध्ये प्रशिक्षकांच्या निवडीमध्ये मोठ्या प्रमाणात बोगसगिरी झाली आहे.शासनाच्या नियमाप्रमाणे निवड न करता यामध्ये आर्थिक तडजोड, वशिलेबाजी व मर्जीतील लोकांना संपर्क करून त्यांचेच अर्ज घेतले व तात्काळ नियुक्ती पत्रे हि दिले. नियमानुसार व पारदर्शकपणे प्रक्रिया न घेतल्यामुळे अनेक होतकरू तरुणांना आपल्या हक्काच्या नोकरीसाठी मुकावे लागणार आहे.तरी याचा निषेध म्हणून राष्ट्रवादी युवक काँग्रेस माजलगाव तालुक्याच्या वतीने शिक्षणाधिकारी व गटशिक्षणाधिकारी यांना मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी काळे फासण्यात येणार आहे.असे राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष मनोज फरके यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळवले आहे.



## क्रांतिसिंह नाना पाटील गणेश मंडळातर्फे निबंध स्पर्धेचे बक्षीस वितरण

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा शहरातील मानाच्या गणेश मंडळापैकी एक असलेले क्रांतिसिंह नाना पाटील गणेश मंडळातर्फे शालेय निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या त्यामध्ये गट क्रमांक एक एक ते चार मधील पहिले बक्षीस केतकी लहू नागरगोजे यांनी मिळवलं तर विराज सचिन जावळे द्वितीय व समर्थ किरण पुराणिक तृतीय पारितोषिक उत्तेजनार्थ श्रेया संतोष थोरबोले यांनी मिळवलं गट क्रमांक दोन पाचवी ते सातवी प्रथम पारितोषिक विजेते शेख मेहराज प्रथम दुतीय पारितोषिक वीर संग्राम तसेच कुणाल फुलचंद गायकवाड यांनी तृतीय पारितोषिक तर आरो दीपक कांबळे उत्तेजनार्थ पारितोषिक मिळवले या स्पर्धेमध्ये जिल्हा परिषद क्रांतीनगर पाटोदा, जिल्हा परिषद भट्टगल्ली पाटोदा, जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा प्रशाला पाटोदा या शाळेनी सहभाग नोंदवला होता सर्वांचे आभार मंडळाच्या वतीने मानण्यात आले यावेळी मंडळाचे अध्यक्ष सुमित कुटे, उपाध्यक्ष निखिल सरगर,सदस्य रोहित वैद्य,अक्षय वीर, योगेश इंगोले, जयसिंग सोडगे, विजय शिंदे, मयूर भोरे,अनिकेत जावळे, विशाल महामुनी, आप्पासाहेब राऊत, रोहन केकान,रोहन वीर, अजय वाल्हेकर, मुकेश ननवरे, लहू नागरगोजे, यांच्या सह मंडळाचे सर्व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते

## शाळा, विद्यालयात पाणी, स्वच्छतागृहाची व्यवस्था करा-भाई ॲड.नारायण गोले



माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील सर्वच शाळात विद्यार्थ्यांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न प्रलंबित असून शाळा आणि विद्यालयात स्वच्छतागृहाचा अभाव आहे त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना पोटाचे विकार जडत असून विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

एका बाजूला शासन कोट्यावधी रुपयांच्या जाहिराती करत असताना दुसऱ्या बाजूला शाळेत पिण्याच्या पाण्याची व स्वच्छतागृहाची व्यवस्था दिसून येत नाही ही बाब गांभीर्यपूर्वक विचार करण्यासारखे असून विद्यार्थ्यांचे भवितव्य शाळेत दडलेले असल्याने शाळेसाठी व विद्यालया साठी शिक्षण विभागाने पुढाकार घेऊन विद्यार्थ्यांच्या मूलभूत प्रश्नावर लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे तरी विद्यार्थ्यांची होणारी हेळसांड थांबवून शाळेत पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहाची व्यवस्था करा अशी मागणी शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ॲड नारायण गोले पाटील यांनी गटशिक्षणाधिकारी श्री महामुनी यांच्याकडे १३ सप्टेंबर रोजी निवेदनाद्वारे केली असून सदर निवेदनावर तालुका चिटणीस भाई मुंजा पांचाळ, तालुका सह चिटणीस भाई राहुल सोळंके, सह चिटणीस भाई सतीश शेजुळ, पुरोगामी युवक संघटनेच्या तालुका अध्यक्ष भाई अशोक कुलकर्णी, पुरोगामी युवक संघटनेचे तालुका चिटणीस भाई अनंत चव्हाण, ज्येष्ठ नेते भाई लक्ष्मण आप्पा चव्हाण, गोविंद आढाव,भरत सोळंके, अभिषेक सोळंके,कृष्णा आसाराम सोळंके,सुशिल हांडे, नुमान भाई चाऊस, संभाजी पाष्टे, भाई माऊली चंदनशिव भाई सुदाम चव्हाण, भाई उल्हास घाटूळ, भाई चांगदेव शेजुळ, भाई भास्कर कांबळे, भाई राजेभाऊ शेरकर, संभाजी चव्हाण आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# सत्य हे जिवनाचे अभुषण

## श्रम्रण मुनि विशेषसागर यांचे प्रबोधन

अंबड । प्रतिनिधी

पं.पू. श्रम्रण मुनिश्री १०८ विशेषसागरजी महाराजींनी श्री १००८ भगवान महावीर दिगंबर जैन मंदिर अंबड येथे उत्तम सत्य धर्माच्या दिवशी धर्म सभेला संबोधित केले. आज उत्तम सत्य धर्माचा दिवस आहे. हा धर्म आपल्याला संकेत देत आहे की, हयाला समजल्या शिवाय किंवा धारण केल्या शिवाय पंचम गतिची प्राप्ती होऊ शकत नाही. सत्य हे जिवनाचे अभूषण आहे. सत्य जिवनाचा शृंगार आहे. हया साठी आपण आपल्या जिवनात सत्य आणले पाहिजे. सत्याच्या बरोबर कोणतेच तप नाही, आणि झुठ (खोटे) च्या बरोबर दुसरे कोणतेच पाप नाही. सत्य तुमच्या जिवनाला प्रकाशित करणारा दिपक आहे. ज्याच्या प्रकाशामध्ये आत्मा अवलोकित होतो.



पं.पू. श्रम्रण मुनिश्री नी पुढे सांगीतले की, आजच्या पाहण्यात वडील मोठे की, मुलगा ? नवरा मोठा की पत्नी ? नातु मोठा की, आजोबा ? लौकीक जिवनात म्हटले जाते मुलगा लहान आहे, आणि वडील मोठे आहेत. पत्नी लहान आहे, पती मोठा आहे, आणि आजोबा मोठे आहेत. हे सर्व दिसते ते सत्य आहे. जसे की ज्यावेळी मुलगा झाला त्यावेळी वडीलांचे वय २५ ते ३० वर्ष असेल म्हणुन मुलाला लहान व वडीलांना मोठे म्हणले आहे. परंतु पाहिले गेले तर ज्यावेळी मुलाचा जन्म झाला त्याच वेळी वडीलांचा पण जन्म झाला. कारण या पहिले त्या व्यक्तीला वडील म्हणणारा कोणीच नव्हता. पं.पू. श्रम्रण मुनिश्री नी पुढे सांगीतले की, "सत्यं शिवं सुन्दरम्? . सत्य हेच शिव आहे, मोक्ष आहे आणि सुंदर आहे. माहात्मा गांधी म्हणत होते. सत्य म्हणजेच ईश्वर आहे. भगवान महाविरांचा संदेश आहे. ज्याला तुम्ही आपल म्हणत आहात ते घर-दुकान परिवार तुमचे नाही आहे हे सत्य आहे. पण मोहामध्ये येऊन व्यक्ती दुस-या पदार्थाला आपला आणि आपल्याला दुसरा मानतो हया असत्याला आपल मानत आहे. सत्याला विसरुन गेला आहे. सत्य ही सुख है.

## पत्रकार बालाजी कुलकर्णी यांना मातृशोक

मंठा । प्रतिनिधी



उमरखेडा (ता.मंठा) येथील सौ रेखाताई रंगनाथराव कुलकर्णी यांचे रविवार ता. १५ रोजी सकाळी सहा वाजता अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले, मृत्यूसमयी त्यांचे वय ७३ वर्षे होते. त्यांच्यावर उमरखेडा येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी सर्व प्रमुख पक्षाचे राजकीय पदाधिकारी, प्रतिष्ठित नागरिक, पत्रकार, आप्तेष्ट - नातेवाईक व ग्रामस्थांची उपस्थिती होती. मंठा कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सचिव रंगनाथराव कुलकर्णी यांच्या पत्नी तर पत्रकार बालाजी कुलकर्णी यांच्या त्या आई होत. त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन मुली, जावई, सुना, नातवंड असा मोठा परिवार आहे.



जालना: नानाजी पाटेकर यांच्या सिहगड पुणे येथील घरच्या गणपतीचे जालन्याचे शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांनी मनोभावे दर्शन घेतले व नाना पाटेकर यांचा सत्कार केला. याप्रसंगी शिवसेना शहरप्रमुख विष्णु पाचफुले ,अमोल कारंजेकर, रामेश्वर दराडे ,पांडुशेठ खैरे यांची उपस्थीती होती.

# शांती प्रस्थापित करणे हा बुद्धांच्या धम्माचा उद्देश - भिख्खू धम्मशील थेरो

माजलगाव । प्रतिनिधी

केवळ शांत राहणे, किंवा तोंड बंद ठेवणे म्हणजे शांती नव्हे, तर कशानेही विचलित न होता संयम धारण करून क्षमाशिलतेने जीवन जगणे म्हणजे शांती होय. वैराने वैर कधीच शमत नाही. जितके प्रेमाने राहाल तितकी जीवनात शांती प्रस्थापित होईल.चुकणाऱ्या व्यक्तीस प्रेमाने समजावून सांगा निश्चित चुका सुधारतील. जो शांती धारण करतो तोच खरी क्रांती करू शकतो. एखाद्याने आपणास कितीही अपमानास्पद, अतिशय वाईट,वागणूक दिली तरीही,आपण राग व्यक्त न करता विचलित न होता स्थिर राहणे म्हणजे आपण शांती पारमितेच्या दिशेने वाटचाल करत आहोत. धम्माच्या मार्गावर चालत आहोत असे समजावे. दुसऱ्याचे वाईट बोलणे आपण मनाला लावून घेणे म्हणजे स्वतःचे मानसिक आरोग्य बिघडवून घेणे होय.





शांतीचे वा अशांतीचे कारण आपणच असतो. बुद्ध काळात त्यांचा प्रभाव कमी करण्याच्या दृष्टिकोनातून अनेक लांच्छने लावण्याचा अनेकांनी प्रयत्न केला परंतु भगवान बुद्धाकडे परमोच्च अशी शांती, क्षमाशीलता असल्याकारणाने बुद्ध विश्वशांतीदूत ठरले म्हणून आजही जगाला युद्धाची नव्हे तर बुद्धाची गरज आहे असे म्हटले जाते. असे प्रतिपादन भिक्खु धम्मशील थेरो यांनी केले. ते सदधम्म सेवा संघ श्रावस्ती बुद्ध विहार येथे आयोजित रविवार बुद्ध वंदना व धम्मदेसना या कार्यक्रमात मानवी जीवनात बौद्ध धम्माचे महत्त्व अर्थात बौद्ध धम्माचे उद्देश या विषयावरील प्रवचनात बोलत होते. सदरील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सदाशिव भालेराव हे होते. सूत्रसंचलन जी.एन.घनघाव यांनी केले तर प्रास्ताविक पांडुरंग जाधव यांनी केले. तर आभार प्रदर्शन एन.जी.शिनगारे यांनी केले. आजच्या पूजेचे यजमान आयु. रंजनाताई कंधारे यांनी अल्पोपहाराची व्यवस्था केली होती. यावेळी संस्थेचे एम.बी चांदमारे,सोपान उजगरे,अरुण नाकलगावकर,रविकांत उघडे,वाल्हाबाई टाकणखार, धम्मपाल जावळे,श्यामराव वाघमारे,विजय होलिकट्टी,हे सदस्य तर यावेळी ज्येष्ठ आंबेडकरी नेते कचरू खळगे,वसंतराव जावळे,उत्तम जोगदंड, एल.आर. मस्के,अनिताताई शिंदे,विद्याताई निसर्गध,सूनिताताई घनघाव,शोभाताई भोजने,लताताई वाघमारे, नालंदाताई भालेराव,मंदाताई धाईजे,सिद्धार्थ जाधव,सिद्धार्थ ढवळे,अनीताताई स्वामी आदी उपासक उपसिका उपस्थित होते.

# महाराष्ट्राची सांस्कृतिक परंपरा असलेली ढोल ताशा वाद्यसंस्कृती पुढे नेण्याचे काम प्रियदर्शनी सांस्कृतिक मंडळ करतंय -बिपीन क्षीरसागर

अंबाजोगाई । प्रतिनिधी

महाराष्ट्राची सांस्कृतिक परंपरा असलेली ढोल ताशा वाद्यसंस्कृती ही प्रियदर्शनी क्रीडा व सांस्कृतिक मंडळ पुढे नेत असल्याचे मत युवा उद्योजक तथा दीनदयाल ना सह बँकेचे संचालक बिपिन क्षीरसागर यांनी व्यक्त केले. लोकमान्य टिळकांनी सुरू केलेली सार्वजनिक श्री गणेश उत्सवाची परंपरा ही प्रियदर्शनी क्रीडा, सांस्कृतिक व व्यायाम मंडळाच्या वतीने वेगळ्या पद्धतीने साजरी करण्यासाठी अंबाजोगाई शहरातील गणेश मंडळासाठी ढोल ताशा पथकाचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी बिपिन क्षीरसागर हे बोलत होते. या ढोल ताशा वाद्य पथकामध्ये शहरातील सोळा पथकांनी आपला सहभाग नोंदवला होता. स्पर्धेचे यावर्षीचे हे दुसरे वर्ष होते. या स्पर्धेच्या उदघाटनास व्यासपीठावर संयोजक संकेत राजकिशोर मोदी, दीनदयाळ ना सह बँकेचे संचालक बिपिन क्षीरसागर, यांच्यासह प्रमुख पाहुणे म्हणून साहित्यिक अभिजित जोंधळे, आदर्श क्रीडा शिक्षक दत्ता देवकते, प्रा ज्ञानेश्वर सोनवणे,महादेव आदमाणे, शाकेर काझी, अकबर पठाण तर विजयी संघाच्या बक्षीस वितरण कार्यक्रमास प्रियदर्शनी क्रीडा मंडळाचे संस्थापक सचिव राजकिशोर मोदी, प्रा वसंत चव्हाण, ऍड. विष्णुपंत सोळंके, मनोज लखेरा, ऍड. संतोष पवार, ऍड. दयानंद लोंढाळ, राजेंद्र मोरे, तानाजी देशमुख, दिनेश भराडीया,निखिल वाजरखेडकर सुनील वाघाळकर, मतीन जरगर, ऍड अनिल लोमटे, अमोल लोमटे, संतोष काळे, सय्येद ताहेर आदींची उपस्थिती होती.





## ढोल ताश्याच्या निनादाने अंबाजोगाई शहर दणाणून निघाले; यावर्षी जवळपास सर्वच संघात ४ ते ६ वर्ष वयोगटातील मुले, मुली व तरुणींचा उत्स्फूर्त सहभाग

या स्पर्धेची सुरुवात श्रीफळ वाढवून आणि ढोल ताशाचे पूजन करून करण्यात आली. स्पर्धेचे प्रास्ताविक करतांना मुख्य संयोजक संकेत राजकिशोर मोदी यांनी प्रियदर्शनी क्रीडा मंडळ हे अंबाजोगाई शहरातील शैक्षणिक,साहित्यिक ,सांस्कृतिक वारसा जोपाण्याचे काम मागील ३५ वर्षांपासून अविरतपणे करत आहे. राजकिशोर मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली संकेत मोदी मित्र मंडळाच्या वतीने ढोल ताशा वाद्य पथकाची स्पर्धा सुरू करण्यात आली. वाद्य स्पर्धेचे हे दुसरे वर्ष असून पहिल्या वर्षी देखील विविध गणेश मंडळांच्या ढोल ताशा पथकांनी मोठा प्रतिसाद दिला होता. अंबाजोगाई शहर हे शैक्षणिक व सांस्कृतिक शहर म्हणून सर्वदूर परिचित आहे. हीच परंपरा पुढे चालवण्यासाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आल्याचे संकेत मोदी यांनी यावेळी नमूद केले. मंडळाच्या वतीने तालुक्यातील विद्यार्थ्यांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध व्हावे यासाठी बालझुंबड चे आयोजन करते. शहरातील गणेश मंडळांसाठी भव्य व खुल्या ढोल वाद्य स्पर्धेत तरुणाईचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहून आनंद झाल्याचे देखील याप्रसंगी संकेत मोदी यांनी नमूद केले. त्याचबरोबर गणेश मंडळाच्या उत्साहाला पुढे नेणारी अंबाजोगाई शहरातील एकम स्पर्धा म्हणून या ढोल ताशा स्पर्धेकडे पाहिले जाईल अशी अपेक्षा यावेळी संकेत मोदी यांनी बोलून दाखवली.

प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले साहित्यिक अभिजित जोंधळे यांनी ही स्पर्धा ही ढोल वाजवण्याची असून न की ढोल बडवण्याची असे मार्मिक उद्गार सहभागी स्पर्धकांना केले. त्याचबरोबर डी जेच्या कर्णकर्कश आवाजापासून गणेश मंडळांनी परावृत्त होऊन पारंपरिक वाद्यांचा वापर करण्याचे आवाहन याप्रसंगी सर्व गणेश मंडळांना केले. या ढोल ताशा स्पर्धेत तरुणांसोबत ४ ते ६ वयोगटातील लहान मुले, मुली व युवतींचा देखील सहभाग मोठया प्रमाणात आढळून आला. या ढोल ताशा स्पर्धेत सहभागी सर्व संघातून नऊ संघ दुसऱ्या फेरीसाठी निवडण्यात आले.निवडलेल्या संघाच्या अंतिम फेरीतुन पुन्हा विजयी संघाचे चयन करण्यात आले. प्रियदर्शनी क्रीडा मंडळाने आयोजित केलेल्या ढोल ताशा वाद्य उद्घाटन स्पर्धेचा अध्यक्षीय समारोप दीनदयाळ नागरी सहकारी बँकेचे संचालक बिपिन क्षीरसागर यांनी केला.ढोल ताशा किंवा अन्य स्पर्धा या आजकाल केवळ महानगरात च होत असल्याचे आपणास आढळून येते. मात्र अंबाजोगाई सारख्या छोट्याशा शहरात देखील अशी स्पर्धा ही

## ईद-ए-मिलादची सार्वजनिक सुट्टी बुधवारी

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हयात ईद-ए-मिलादची सार्वजनिक सुट्टी बुधवारी दि. १८ सप्टेंबर २०२४ ला आहे.

महाराष्ट्र शासनाचे शासन अधिसूचनेतील तरतुदीनुसार मुस्लिम बांधवाना ईद-ए-मिलाद हा सण मोठ्या प्रमाणात साजरा करण्यासाठी तसेच सामाजिक सलोखा व कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्याच्या हेतुने बीड जिल्हयासाठी सोमवार, दिनांक १६ सप्टेंबर, २०२४ करिता घोषित केलेली ईद-ए-मिलाद ची सार्वजनिक सुट्टी रद्द करुन ती बुधवार, दिनांक १८ सप्टेंबर, २०२४ या दिवशी जाहीर करण्यात आली आहे, असे जिल्हाधिकारी, बीड यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.

## शुभम शेकडे यांची उत्तुंग भरारी

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील मौजे म्हसोबाचीवाडी या छोट्याशा गावात असणारे सोन्याबापू रामराम शेकडे व त्यांची पत्नी आशाबाई शेकडे हे गरीब कुटुंबातले एक ऊसतोड मजूर ऊस तोडणी मजूराचा मुलगा काय करु शकतो याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे सोन्याबापू रामराव शेकडे हे परिस्थिती अभावी शिक्षण तर नाही घेऊ शकले परंतु सोन्याबापु व आशाबाई यांनी यांचा मुलगा शुभम शेकडे आम्ही जेवढं हवं तेवढं कष्ट करु पण आमच्या मुलाला डॉक्टरच बनवू असा निधार केला अन्? त्यांच्या कष्टाला अखेर शुभमने यश प्राप्त करुन जे फळ दिले ते कौतुकास्पद आहे याच्याकडे पाहून लक्षात येते. शुभमचे आई-वडील तब्बल २० वर्षापासून ऊसतोडणीचे काम करतात. आई- वडील ऊस तोडणीसाठी गेल्यानंतर शुभमचा सांभाळ आजी-आजोबा यांनी केला. शुभमचे प्राथमिक शिक्षण म्हसोबाचीवाडी येथील प्राथमिक शाळेत झाले व माध्यमिक शिक्षण वृद्धेश्वर विद्यालय गहुखेल व भैरवनाथ विद्यालय अरणविहिरा या ठिकाणी झाले व उच्च माध्यमिक शिक्षण आनंदराव धोंडे महाविद्यालय पार पडले घरची परिस्थिती अतिशय गरीबीची असूनसुद्धा शुभमने अभ्यासावर आणि शिक्षणावर कधी दुर्लक्ष होऊ दिले नाही. काल प्रसिद्ध झालेल्या .... च्या फेरीत शुभमचा .... साठी साई आयुर्वेदिक कॉलेज बार्शी, जि सोलापूर या ठिकाणी प्रवेश निश्चित झाला आणि शुभमचे डॉक्टर होव्याचे स्वप्न पूर्ण झाले. शुभम आपल्या यशाचं श्रेय आई-वडील, जाजी-आजोबा, आजपर्यंत शिकविलेल्या गुरुजनांना व मार्गदर्शक जेष्ठ बंधू श्री. शेकडे एम. डी. (सर) यांना देतो, या उत्तुंग यशाबद्दल म्हसोबावाडी व पंचक्रोशीतुन त्याच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी परिस्थितीची



**ऊस तोडणी मजुराचा मुलगा झाला डॉक्टर**

◀◀ पान ३ वर

## पसायदान सेवा प्रकल्पाच्या चिमुकल्यांना दिला दोन महिन्यांचा किराणा

### भाई सिताराम बडे यांची वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी

**बीड । प्रतिनिधी**

वाढदिवस म्हटलं की शहरात मोठमोठे बॅनर, फटाक्यांची आतिषबाजी, पार्ट्या देऊन पैशांची उधळपट्टी केली जाते. भाई सिताराम बडे यांनी मात्र आपल्या वाढदिवसानिमित्त ढेकणमोह येथील पसायदान सेवा प्रकल्पातील अनाथ, बेघर, वंचित, आत्महत्याग्रस्त पालकांच्या मुलांसाठी दोन महिन्याचा किराणा व शैक्षणिक साहित्य दिले. यातून सिताराम बडे यांनी सामाजिक बांधिलकी जोपासत पसायदानच्या मुलांसोबत आपला वाढदिवस साजरा केला.




ढेकणमोह येथील निसर्गरम्य अशा वातावरणात व डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या पसायदान प्रकल्पातील मुलांसोबत भाई सिताराम बडे यांनी आपला वाढदिवस साजरा केला. वाढदिवसानिमित्त अनेकजण हजारो रुपयाची उधळपट्टी करीत दिखाऊपणा करीत असतात. भाई बडे यांनी मात्र आपल्या

◀◀ पान ३ वर

## माकपचे नेते कॉम्रेड सिताराम येचुरी यांना अंबाजोगाई येथे सर्वपक्षीय श्रद्धांजली

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे देशाचे नेते कॉम्रेड सिताराम येचुरी यांना अंबाजोगाई येथे दिनांक १४ सप्टेंबर रोजी सर्वपक्षीयाच्या वतीने श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. नैतिकतेची चौकट आखून घेतलेल्या केडर बेस्ड पक्षाला आजच्या उथळ आणि बाजारू व्यवस्थेत निसर्गत: अनेक मर्यादा पडतात. तशाही परिस्थितीत डाव्या राजकारणाला सतत राजकीय परिघाच्या चर्चेत ठेवन्यात कॉम्रेड येचुरी यांचे मोठे योगदान होते.त्यांचं जाणं अकाली असल्याने ते नुकसान मोठे आहे.

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे देशाचे महासचिव कॉम्रेड सीताराम येचुरी यांचे दिनांक १२ सप्टेंबर रोजी दुःखद निधन झाले आहे. त्यांना अंबाजोगाई येथील विलासराव देशमुख सभागृहामध्ये दिनांक १४ सप्टेंबर रोजी दुपारी पाच वाजता सर्वपक्षीय शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते.




सर्वपक्षीय शोकसभेच्या वेळी कॉम्रेड सिताराम येचुरी यांच्या प्रतिमेला पुष्प,हार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी कॉ. बब्रुवान पोटभरे, राजेसाहेब ◀◀ पान ३ वर

## डॉ.सारीकाताई क्षीरसागर यांच्या हस्ते नागापूर येथे श्रींची आरती

बीड़ । प्रतिनिधी

नागापूर खुर्द येथील सावता सार्वजनिक गणेश मंडळांच्या आरतीसाठी कल्पतरू प्रतिष्ठानच्या सचिव आदरणीय सौ डॉ. सारिका ताई क्षीरसागर यांनी आमचे स्विकारून आरतीसाठी आल्यानंतर आरती करून गावातील अबालवृद्ध यांची आवर्जून चौकशी केली.



कोणालाही कोणत्याही संदर्भात अडचणी सोडविण्यासाठी प्रयत्नशील राहिल असे आश्वासन दिले.आदरणीय ताईंना नवगण राजुरी नंतर नागापूर खुर्द हे हक्काचे गाव असल्याची जाणीव झाली यावेळी गावातील प्रतिष्ठित नागरिक वसंतराव लव्हाळे.माजी सरपंच मसुराम साळुंके.भरतराव साळुंके.रायभान साळुंके सावता गणेश मंडळांचे मुख्य मार्गदर्शक तथा राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी बुथ प्रमुख हनुमान साळुंके धर्मराज साळुंके.राहुल साळुंके परमेश्वर साळुंके.दत्ता साळुंके व गणेश मंडळाचे सर्व सदस्य उपस्थित होते.

## ग्रामीण पोलिसांचे अवैध धंद्यावरील धाडसत्र सुरूच

बीड । प्रतिनिधी

पोलीस अधिक्षक अविनाश बारगळ यांनी जिल्ह्यातील अवैध धंद्यावर कारवाईचे सक्त आदेश दिल्यामुळे जिल्ह्याभरात अवैध धंदे व नियम मोडणाऱ्यांवर गुन्हा दाखल होण्याचे प्रमाण वाढले आहे.याच बरोबर ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत सुरु असणाऱ्या अवैध धंद्यावरही सहाय्यक पोलीस निरीक्षक बाळराजे दराडे यांच्या सुरु असलेल्या कारवायांचा वेग आता आणखीनच वाढला आहे.शनिवारी रात्रीतून आठ ठिकाणी छापे मारून ४ लाख ५० हजारांचा मुद्देमाल वेगवेगळ्या कारवायांतून जप्त करण्यात आला.पोलीस अधिक्षक अविनाश बारगळ,अप्पर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर,पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली या कारवाया झाल्या आहेत.



शनिवारी (दि.१४) रात्री ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मंजेरी फाटा मटका बुक्कीवर धाड,खामगावमध्ये जुगाऱ्यांवर छापा,तिप्पटवाडीच्या इंद्रायणी

◀◀ पान ३ वर

## महाराष्ट्र सांस्कृतिक गणेश मंडळांच्या वतीने कार्यकर्त्याचा गौरव

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

गणेशोत्सव म्हणजे आनंद उत्साह ऊर्जा मराठी अस्मिता परंपरा आणि भारतीय संस्कृतीचे प्रतीक असणारा सण असून ढोल ताशाच्या गजरात आगमन झाले आता विसर्जनही होईल अंबाजोगाईच्या देशपांडे गल्लीतील महाराष्ट्र सांस्कृतिक गणेश मंडळाची वेगळी ओळख असून समाजपयोगी कार्यक्रमासाठी या मंडळाचा नेहमीच पुढाकार असतो गणेशोत्सव हा आनंदाच्या पर्वणीचा सण असल्यामुळे दहा दिवस भावभक्तीचा गजर होतो मंडळाच्या वतीने गणेशोत्सवात सहभागी होणाऱ्या कार्य तत्पर मंडळाच्या कार्यकर्त्यांचे स्वागत नुकतेच करण्यात आले त्यात बाळासाहेब मुकदम प्रज्वल देशपांडे, प्रसिद्धी प्रमुख पत्रकार राहुल देशपांडे,मंडळाचे अध्यक्ष सुमित केजकर, शैलेश गोस्वामी,सागर दिक्षित,विश्वंभर गोस्वामी,अक्षय मोहरीर, पद्मनाभ देशपांडे, अमोल कुलकर्णी, संकेत गिरवलकर, अवधूत देशपांडे, महेश आराध्ये,स्वप्निल पत्की,राहुल गाल्टे,अनंत आवटी, वेध पुराणिक,सुश्रुत पुराणिक,प्रसाद परळकर यांचा गौरव करण्यात आला.

पारंपारिक वाद्यात निघणार मिरवणुक

गणेश विसर्जनासाठी महाराष्ट्र सांस्कृतिक गणेश मंडळाची मिरवणुक ही पारंपारिक वाद्यांच्या गजरात निघणार असून यामध्ये युवक युवतींचे ढोल ताशा पथक,लेझीम पथक मंडळाच्या कार्यकर्त्यांचा आकर्षक पेहराव तसेच देखावा राहणार असल्याची माहिती देण्यात आली.

## संस्थेला आशादायक भविष्याकडे नेण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करू -माजीमंत्री क्षीरसागर

बीड । प्रतिनिधी

ज्या काळात कुठल्याही सुविधा किंवा फारसा प्रतिसाद नव्हता त्या काळात स्वर्गीय काकूंनी या संस्थेला संजीवनी दिली म्हणूनच आज आपण पन्नास वर्षे पूर्ण करू शकलो एखादी संस्था सुवर्ण महोत्सव साजरा करते यामागे त्या संस्थेची वाटचाल उल्लेखनीय असते,संस्थेला आशादायक भविष्याकडे नेण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करू असे प्रतिपादन माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले आहे

सोनाजीराव शिरसागर होमिओपॅथिक मेडिकल कॉलेजच्या सुवर्ण महोत्सवाचा सोहळा आणि राष्ट्रीय होमिओपॅथी सेमिनारचे मोठ्या दिमाखात आयोजन करण्यात आले होते, संपूर्ण देशभरात विविध



राज्यातून उपस्थित असलेल्या तज्ञ होमिओपॅथी डॉक्टरांची उपस्थिती होती, प्रारंभी महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी आलेल्या सर्व मान्यवरांचे औक्षवंत करून स्वागत केले तर श्री गणेश वंदना हे कथक नृत्य सादर करून सोहळ्याचा प्रारंभ झाला त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून कार्यक्रमात सुरुवात झाली. यावेळी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर,कुलगुरू डॉ पिनांकिन त्रिवेदी, प्रति कुलगुरू डॉ मिलिंद निकुंभ, डॉ ओमप्रकाश शेटे,डॉ विजुताई महिंद्रे-क्षीरसागर, डॉक्टर सुभाष सिंग, डॉक्टर शेंथील कुमार,डॉक्टर संजय गुप्ता,डॉक्टर सुशील कुमार डॉ राजकुमार पाटील,डॉ जवाहर शहा,डॉ मोतीलाल,डॉ कांचन देसरडा,डॉ बाळासाहेब पवार,डॉ अजित फुंदे, संस्थेचे अध्यक्ष नानासाहेब काकडे,युवनेते हेमंत क्षीरसागर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते, यावेळी डॉ अरुण भस्मे प्राचार्य महेंद्र गौशाळ उपप्राचार्य डॉ गणेश पांगारकर व महाविद्यालयाच्या प्राध्यापकांच्या हस्ते मान्यवरांचा सन्मान करण्यात आला

प्रारंभी प्रास्ताविक प्राचार्य महेंद्र गौशाल यांनी तर संस्थेच्या वाटचालीची माहिती डॉ अरुण भस्मे यांनी दिली तर सूत्रसंचालन नवी दिल्ली येथील डॉ रुपाली भालेराव यांनी केले

यावेळी कार्यक्रमाला केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी व्हिडिओद्वारे सुवर्ण महोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या तर उपस्थित मान्यवरांनी संस्थेचे कौतुक करून माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली संस्थेची वाटचाल पुढच्या प्रवासात अधिक बळकट होवो अशा भावना व्यक्त केल्या,तर कुलगुरू मिलिंद निकुंभ म्हणाले की एखादी संस्था

◀◀ पान ३ वर

## मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून अथर्व भंडारे याच्या उपचारासाठी एक लाख रुपयांची मदत

वडवणी । प्रतिनिधी

मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून वडवणी येथील अथर्व कचरू भंडारे या मुलाच्या उपचारासाठी एक लाख रुपये मदत देण्यात आलेली असून या मदतीचे पत्र युवा सेना बीड जिल्हा प्रमुख रविराज बडे व वैद्यकीय मदत कक्षाचे बीड जिल्हा प्रमुख ओमराजे यांच्या हस्ते घरी जाऊन भंडारे यांना देण्यात आले.

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे ,खा. डॉक्टर श्रीकांत शिंदे यांच्या संकल्पनेतून शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष हा गरजु व गोरगरीब रुग्णांना वैद्यकीय उपचार मिळावा यासाठी सुरू करण्यात आलेला असुन वडवणी येथील कचरू भंडारे यांच्या अथर्व या मुलाला मोटार सायकल वरून पडल्याने डोक्याला मार लागला होता तरी त्याला संभाजी नगर येथील दवाखान्यात उपचारासाठी दाखल करण्यात आलेले होते या मुलाच्या ऑपरेशन उपचारासाठी आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी वैद्यकीय मदत कक्षाचे प्रमुख मंगेशजी चिवटे यांच्या कडे वैद्यकीय मदत कक्षाचे बीड जिल्हा प्रमुख ओमराजे जाधव यांनी तात्काळ प्रस्ताव



तयार करून सादर केला असता त्यांनी त्याच्या वैद्यकीय उपचारासाठी तात्काळ एक लाख रुपये निधी मंजूर केल्याने त्या बालकाला वैद्यकीय उपचार मिळाले तरी भंडारे कुटुंबाला वैद्यकीय मदत मंजूर करण्यात आलेले पत्र युवा सेना बीड जिल्हा प्रमुख रविराज बडे व वैद्यकीय मदत कक्ष बीड जिल्हा प्रमुख ओमराजे जाधव, कैलास कसबे यांनी घरी जाऊन दिले.तरी आमच्या मुलाच्या वैद्यकीय उपचारासाठी एक लाख रुपये मदत दिल्या बद्दल पालक कचरू भंडारे यांनी मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे,खा. डॉक्टर श्रीकांतजी शिंदे, मंगेशजी चिवटे यांचे आभार मानले आहेत.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk



# विसर्जन मिरवणुकीत शहर परिसरातील १७ रस्ते राहणार बंद

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील गणोशोत्सव सोहळ्यासह विसर्जन मिरवणुकीला मोठ्या प्रमाणावर नागरिक उपस्थित राहतात, त्यामुळे शहरात मोठी गर्दी होती, त्याचबरोबर मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी देखील निर्माण होते, या निमित्ताने शहरातील विसर्जन मिरवणुकीनिमित्त शहरातील वाहतूक व्यवस्थेत बदल करण्यात येणार आहेत. शहरातील मध्य भागातील प्रमुख १७ रस्ते वाहतुकीसाठी बंद राहणार आहेत. मिरवणुकीची सांगता झाल्यानंतर प्रमुख रस्ते वाहतुकीसाठी खुले करून देण्यात येणार आहेत.



मंगळवारी (१७ सप्टेंबर) सकाळी साडे दहाच्या सुमारास विसर्जन मिरवणुकीला सुरूवात होणार आहे. मिरवणूक सुरू होण्यापूर्वी मध्य भागातील लक्ष्मी रस्ता, छत्रपती शिवाजी रस्ता, टिळक रस्ता, शास्त्री रस्ता, केळकर रस्ता, बाजीराव रस्ता, कुमठेकर रस्ता, गणेश रस्ता, जंगली महाराज रस्ता, कर्वे रस्ता, फर्ग्युसन रस्ता, भांडारकर रस्ता, पुणे-सातारा रस्ता, सोलापूर रस्ता, प्रभात रस्ता, बगाडे रस्ता गुरू नानक या रस्त्यांवरील वाहतूक विसर्जन मिरवणुकीची सांगता होईपर्यंत बंद राहणार आहे, अशी माहिती वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त अमोल झेंडे यांनी दिली आहे. त्याचबरोबर जंगली महाराज रस्त्यावरील झाशीची राणी चौक, छत्रपती शिवाजी रस्त्यावरील काकासाहेब गाडगीळ पुतळा, मुदलियार रस्त्यावरील दारूवाला पूल, लक्ष्मी रस्त्यावरील संत कबीर पोलीस चौकी, सोलापूर रस्त्यावरील सेव्हन लव्हज् चौक, सातारा रस्त्यावरील व्होल्गा चौक, बाजीराव रस्त्यावरील वीर सावरकर पुतळा चौक, लाल बहाद्दुर शास्त्री रोडवरील सेनादत्त पोलीस चौकी, कर्वे रस्त्यावरील नळस्टॉप, फर्ग्युसन कॉलेज रस्त्यावरील गोखले स्मारक चौकातून वाहतूक वळवण्यात (डायव्हर्जन पॉइंट) येणार आहे.

## विसर्जन मार्गावर वाहने लावण्यास मनाई

लक्ष्मी रस्ता, केळकर रस्ता, कुमठेकर रस्ता, बाजीराव रस्ता, टिळक रस्ता, छत्रपती शिवाजी रस्ता, शास्त्री रस्ता, जंगली महाराज रस्ता, कर्वे रस्ता, फर्ग्युसन रस्त्यावर वाहने लावण्यास मनाई करण्यात आली आहे. खंडुजीबाबा चौक ते वैशाली हॉटेल चौक या रस्त्यांवर वाहने लावण्यास मनाई करण्यात आली आहे.

-------------

## वर्तुळाकार मार्ग सुरू राहणार

कर्वे रस्ता-नळस्टॉप चौक- विधी महाविद्यालय रस्ता- सेनापती बापट रस्ता-गणेशखिंड रस्ता- वेधशाळा चौक- संचेती रुग्णालय- अभियांत्रिकी महाविद्यालय चौक, मंगळवार पेठेतील शाहीर अमर शेख चौक- मालधक्का चौक- बोल्हाई चौक-नरपतगिरी चौक- नेहरु रस्ता-संत कबीर चौक-सेव्हन लव्हज् चौक- मार्केट यार्ड वखार महामंडळ चौक- शिवनेरी रस्ता- सातारा रस्ता- व्होल्गा चौक (लक्ष्मीनारायण चौक)-मित्रमंडळ चौक- सिंहगड रस्ता-शास्त्री रस्ता- सेनादत्त पोलीस चौकी- म्हात्रे पूल-नळस्टॉप चौक असा वर्तुळाकार मार्ग राहणार आहे.

-------------

## शहरात ४८ तास अवजड वाहनांना बंदी

गणेश विसर्जन मिरवणुकीच्या पार्श्वभूमीवर सोमवारी मध्यरात्रीनंतर शहरात अवजड वाहनांना बंदी घालण्यात आली आहे. विसर्जन मिरवणुकीचा समारोप झाल्यानंतर वाहतूक पूर्ववत करण्यात येईल, अशी माहिती देखील वाहतूक शाखेकडून देण्यात आली आहे.

# आंधळगाव परिसरात बिबट्याचे दर्शन

शिरूर : शिरूर तालुक्यातील आंधळगाव परिसरात बिबट्याचा पुन्हा वावर सुरू झाला आहे. दिवसा व रात्रीच्या वेळी गावातील घरांसमोर व शेतात बिबट्याचे दर्शन होत आहे. त्यापैकी नानासाहेब परभाणे यांच्या उसाच्या शेतात एक मादी व एक बिबट्या तीन पिल्लासह शुक्रवारी (ता.१३) दिवसाढवळ्या बिनधास्तपणे फिरत असल्याचे निदर्शनास आले आहे.



मागील महिन्यात अनेक वेळा बिबट्या दिसला असून, त्याने घरांसमोर बांधलेल्या पाळीव प्राण्यावर हल्ला केल्याच्या घटना घडल्या आहेत. दोन दिवसांपूर्वी येथील सतीश पवार यांच्या कालवडीवर हल्ला केला होता. माणिकराव कुसेकर यांच्या पाळीव कुत्र्याला बिबट्याने जखमी केले आहे. रविवारी (ता.१५) निवृत्ती खलाटे यांच्या शेतात दिवसभर बिबट्या डरकाळ्या फोडत असल्याचा आवाज येत होता. त्यामुळे शेतात काम करणाऱ्या महिला या भयभीत झाल्या आहेत. भरवस्तीत बिबट्या दिसत असल्यामुळे ग्रामस्थांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. वन विभागाने तातडीने बिबट्याचा बंदोबस्त करावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. दरम्यान, ग्रामस्थांनी रात्रीच्या वेळी घराबाहेर पडू नये, अत्यावश्यक कामांसाठी बाहेर जायचे झाल्यास एकटे जाऊ नये, समूहाने बाहेर पडावे आणि हातामध्ये बॅटरी व काठी घेऊन जावे, नागरिकांनी विशेषतः महिला व बालकांनी सतर्क राहावे, असे आवाहन पोलिस पाटील ऊर्मिला कुसेकर यांनी केले.

# मुंबई ते बंगलोर’ १४ पदरी महामार्गाचे काम ६ महिन्यात होणार सुरू -नितीन गडकरी

**पुणे । प्रतिनिधी**

‘‘मुंबईतील अटल सेतूपासून मुंबई-बंगलोर हा १४ पदरी द्रुतगती महामार्ग नव्याने बांधण्यात येणार असून हा महामार्ग पुणे रिंगरोडला जोडणारा असणार आहे. या नव्या महामार्गाची निविदा निघाली आहे. येत्या सहा महिन्यात महामार्गाचे बांधकाम सुरू होईल,’’ अशी घोषणा केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांनी केली.



या नव्या महामार्गामुळे मुंबईहून निघालेली अनेक वाहने पुणे शहरात न येता यामार्गे पुढे जातील. त्यामुळे सध्या सुरू असलेल्या मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील आणि यामार्गे शहरात येणारी वाहतूक कोंडी कमी होऊ शकेल, असा विश्वास गडकरी यांनी व्यक्त केला आहे. त्यामुळे येत्या काळात मुंबई-पुणे प्रवास अधिक वेगवान होण्याची चिन्हे आहेत. सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ आणि सीओईपी माजी विद्यार्थी संघटना यांच्या वतीने आयोजित ‘सीओईपी अभिमान पुरस्कार’ सोहळा गडकरी यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. यावेळी ते बोलत होते. ‘‘मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग बांधला, त्यावेळी पुढील ५० वर्षात आपल्याला काही करावे लागणार नाही, असे आम्ही म्हणायचे. परंतु, नागपूरमधून मी निघालो आणि पुण्यात पोचलो. पण माझा मुलगा आणि सून मुंबईमधून निघाले आणि लोणावळ्यात एक तास अडकले. बरं झाले मी नवीन द्रुतगती महामार्ग निर्माण करण्याची घोषणा केली.’’ असेही गडकरी यांनी आवर्जून सांगितले.

गडकरी म्हणाले,‘‘मुंबईतील अटल सेतू पुलावरून उतरल्यावर तेथून थेट बंगलोरला जाणारा एक १४ पदरी द्रुतगती महामार्ग बांधण्याची निविदा निघाली आहे. हा महामार्ग थेट मुंबईहून निघून पुण्याच्या रिंग रोडला जोडून ‘मुंबई-पुणे रिंगरोड मार्गे- बंगलोर’ असा असेल. या महामार्गामुळे सध्याच्या ‘मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील अर्ध्याहून अधिक वाहतूक ही या मार्गाने पुढे जाईल. मुंबईतील अटल सेतूवरून खाली उतरल्यास लगेचच वाहने या १४ पदरी मुंबई-बंगलोर महामार्गाला लागतील, याचमार्गाने पुणे रिंग रोडमार्गे पुढे बंगलोरला जाणे शक्य होईल. तसेच या रस्त्याने पुढे दोन तासात वाहने छत्रपती संभाजीनगर रस्त्याला जोडली जातील.’’

# जुन्नरच्या महाविद्यालयात विविध स्पर्धांचे आयोजन

**जुन्नर । प्रतिनिधी**

येथील श्री शिवछत्रपती महाविद्यालयात गणेशोत्सवानिमित्त विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्याच्या हेतूने विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. यामधील हस्ताक्षर स्पर्धेत मृणाल पांडे, वैष्णवी बनकर व प्रज्ञा वाव्हळ यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकाविले. मेहंदी स्पर्धेत प्रियांका गायकवाड, झेहरा सय्यद व प्रांजल डोके यांनी, पारंपारिक वेशभूषा स्पर्धेत विशाल भवारी, मानसी ढोमसे व वैष्णवी बनकर यांनी, पथनाट्य व एकपात्री स्पर्धेत सूर्यजा माने, निकिता डोके व अयान तिरंदाज यांनी, अन्नकोट स्पर्धेत प्रियंका परदेशी, मृणाल राबाडे व वेदश्री भालेकर यांनी, वन मिनिट ऑन स्टेज या स्पर्धेत गौरी खिलारी, अल्फिया पठाण व कीर्ती बटवाल या विद्यार्थ्यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविले. या सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

# पुण्याच्या गोखले इन्स्टिट्यूटचे कुलगुरु अर्थतज्ज्ञ अजित रानडे यांना पदावरुन हटवलं

**पुणे । प्रतिनिधी**

गोखले इन्स्टिटच्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्सच्या कुलगुरुपदावरुन प्रख्यात अर्थतज्ज्ञ डॉ. अजित रानडे यांची हकालपट्टी करण्यात आली आहे. अध्यापनाच्या अनुभवाशी संबंधित पात्रता निकषांची पूर्तता केली नसल्याचं सिद्ध झाल्यानंतर त्यांना अडीच वर्षांनंतर हटवण्यात आलं आहे. काही महिन्यांपासून रानडे यांच्या नियुक्तीवरून वाद सुरू होता. पुणे-स्थित ॠखझए ही भारतातील सर्वात जुनी अर्थशास्त्र संशोधन आणि प्रशिक्षण संस्था आहे.

जीआयपीईचे कुलपती बिबेक देबरॉय यांनी नेमलेल्या फॅक्ट-फाइन्डिंग पॅनेलने रानडे यांची नियुक्ती णउ्छ च्या निकषांशी अनुरूप नसल्याचे आढळून आल्यानंतर त्यांना पदावरून हटवलं. रानडे दोन वर्षांहून अधिक काळ नोकरीत होते. रानडे यांनी प्राध्यापक म्हणून १० वर्षांच्या अखंड



अध्यापनाच्या अनुभवाचे पात्रता निकष पूर्ण केले नाहीत असा निष्कर्ष समितीने काढला आहे. त्यातूनही त्यांना कुलगुरूपदावरुन हटवण्यात आल्याचं सांगितलं जात आहे.

२०२२ मध्ये अजित रानडे यांची गोखले इन्स्टिटच्यूटच्या कुलगुरूपदी नियुक्ती करण्यात आली होती. मात्र रानडे या पदासाठी पात्र नाहीत, विद्यापीठ अनुदान आयोग आणि राज्य सरकारला चुकीची माहिती देण्यात आली, अनावश्यक पदांची निर्मिती करुन आर्थिक गैरव्यवस्थापन झाले अशा प्रकारच्या तक्रारी युजीसीकडे करण्यात आल्यानंतर कुलपती डॉ. राजीव कुमार यांनी डॉ. रानडे यांना कारणे दाखवा नोटीस बजावली होती. मात्र त्याहीवेळेस रानडे यांनी सर्व फेटाळले होते. दरम्यान या प्रकरणात नवनियुक्त कुलपती डॉ. बिबेक देबरॉय यांनी सत्यशोधन समितीची स्थापना केली होती. या समितीच्या अनेक बैठकाही झाल्या होत्या. यानंतर समितीने रानडे यांची नियुक्ती रद्द करण्याची शिफारस केली. समितीच्या तपासणीअंतर्गत रानडे यांची उमेदवारी युजीसीने निश्चित केलेल्या निकषांची पूर्तता करीत नाही.

# क्रीडा संकुलात येणाऱ्या खेळाडूंना अधिकाधिक सुविधा मिळण्याच्या दृष्टीने कामे करावीत - उपमुख्यमंत्री पवार

पुणे । प्रतिनिधी

उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी बारामती परिसरात सुरु असलेल्या विविध सार्वजनिक विकासकामांची पाहणी केली; क्रीडा संकुलात येणाऱ्या खेळाडूंना अधिकाधिक सुविधा मिळतील यादृष्टीने अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन गतीने कामे पूर्ण करावीत, असे निर्देश त्यांनी दिले.

पवार यांनी कन्हेरी वन विभाग, जळोची उपबाजार येथील कृषी उत्पन्न बाजार समिती इमारत, फळे व भाजी हाताळणी केंद्र, मेडद येथील शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय तसेच क्रीडा संकुल नूतन इमारत, रेशीम कोष खरेदी विक्री बाजारपेठ कोषोत्तर प्रक्रिया पथदर्शक तथा प्रशिक्षण केंद्र, गरुडबाग येथील कॅनॉलचे सुशोभिकरण, चिल्ड्रन पार्क येथे



सुरू असलेल्या सार्वजनिक विकासकामांची पाहणी करुन संबंधित अधिकांऱ्याकडून माहिती घेतली. यावेळी उपवनसंरक्षक महादेव मोहिते, अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, उप विभागीय अधिकारी वैभव (झींपश) नावडकर, महावितरणचे मुख्य अभियंता अंकुश नाळे आदी उपस्थित होते. क्रीडा संकुलात मॅट फिनिशिंग असलेल्या फरशा बसवा. भिंतीच्या रंगानुसार कक्ष, कक्षातील सोफा, शौचालय आदी बाबींचा विचार करुन इलेक्ट्रिकल उपकरणे वापरावीत. पुरेसा सुर्यप्रकाश, हवा खेळती राहील याची काळजी घेऊन कामे करा.

जळोची उपबाजार येथील फळे व भाजी हाताळणी केंद्राच्या परिसरात सरळ वाढणारी, सावली देणाऱ्या प्रजातींचे वृक्षारोपण करा. कृषी उत्पन्न बाजार समिती नुतन इमारतीच्या परिसरातील रस्त्याचा विचार करुन पुरेशा उंचीच्या संरक्षक भिंती उभाराव्यात. परिसरात नागरिकांसाठी बैठक व्यवस्था करावी. कन्हेरी वनविभागात विविध प्रजातींचे वृक्षारोपण करा. यापूर्वी लावण्यात आलेल्या झाडांचे संगोपन झाले पाहिजे, याकडे लक्ष द्यावे. लहान मुले व ज्येष्ठ नागरिकांना चढ-उतर करण्यासाठी सोईस्कर पायऱ्या व बैठक व्यवस्था करावी. तलावातील पाणी व परिसर स्वच्छ राहील, याची दक्षता घ्यावी. परिसरात फिरतांना रस्त्याच्या बाजूला असणाऱ्या झाडाच्या फांद्यांमुळे अडथळा निर्माण होणार नाही, याबाबत दक्षता घ्यावी. शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय तसेच गरुडबाग येथील कॅनॉलचे सुशोभिकरण, चिल्ड्रन (झींपश) पार्क येथील कामे लवकरात लवकर पूर्ण करावीत. रेशीम कोष खरेदी विक्री बाजारपेठ कोषोत्तर प्रक्रिया पथदर्शक तथा प्रशिक्षण केंद्राच्या नूतन इमारतीचे बांधकाम करतांना समोरील मुख्य रस्त्यापेक्षा उंच जोत्याचे बांधकाम करावे.

परिसरातील विकासकामे करताना ती गुणवत्तापूर्ण, दर्जेदार, टिकाऊ आणि वेळेत पूर्ण होतील, याकडे लक्ष द्या. कोणतीही कामं प्रलंबित राहणार नाहीत, याबाबत दक्षता घ्यावी, अशा सूचना उपमुख्यमंत्री पवार यांनी दिल्या. यावेळी उप विभागीय पोलीस अधिकारी डॉ. सुदर्शन राठोड, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता अमोल पवार, जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता दिगंबर डुबल, तहसीलदार गणेश शिंदे, मुख्याधिकारी महेश रोकडे, गट विकास अधिकारी अनिल बागल, वन परिक्षेत्र अधिकारी अश्विनी शिंदे, बारामती सहकारी बँकचे अध्यक्ष सचिन सातव, बारामती कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुनील पवार आदी उपस्थित होते.

# पॅरा ऑलिंपिक वीर सचिन खिलारीला’ पुनीत बालन ग्रुप’कडून पाच लाखांचे बक्षिस

पुणे । पॅरिसमध्ये नुकत्याच पार पडलेल्या पॅरा ऑलिंपिक स्पर्धेत गोळा फेक मध्ये भारताला सिल्वर मेडल मिळवून देणाऱ्या सचिन खिलारीला युवा उद्योजक व श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपतीचे उत्सव प्रमुख पुनीत बालन यांच्या ‘पुनीत बालन ग्रुप’कडून पाच लाखांचे बक्षिस जाहीर करण्यात आले आहे. तर याच स्पर्धेत या मोसमातील सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या संदीप सरगरला दोन लाखांचे बक्षीस देण्यात येणार आहे.

हिंदुस्थानातील पहिला सार्वजनिक गणपती श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपतीची आरती खिलारी आणि सरगर यांच्या हस्ते झाली. यावेळी पुनीत बालन यांनी ही घोषणा केली. ‘पुनीत बालन ग्रुप’कडून विविध खेळांच्या विविध स्पर्धांबरोबर खेळांडूना प्रोत्साहन दिले जाते.



अनेक खेळांडूना आर्थिक मदतही केली जाते. पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेत नेमबाजीत कांस्य पदक मिळविणाऱ्या स्वप्निल कुसळेला ११ लाखांचे बक्षीसही ‘पुनीत बालन ग्रुप’कडून देण्यात आले. पॅरिसमध्ये पार पडलेल्या पॅरा ऑलम्पिक स्पर्धेत सिल्वर मेडल विजेत्या सचिन खिलारी आणि भाला फेक स्पर्धेत कांस्य पदकाने हुलकावणी दिलेल्या संदीप सरगर यांना प्रोत्साहान देण्यासाठी पुनीत बालन यांनी अनुक्रमे ५ व २ लाखांचे बक्षिस जाहीर केले आहे. यावेळी दोन्ही खेळाडूंनी पुनीत बालन यांचे आभार मानले तर या खेळाडूंनी आगामी काळात चांगली कामगिरी करून भारत देशाला पदके मिळवून द्यावीत, अशी प्रार्थना पुनीत बालन यांनी श्री. गणरायाकडे केली.

# कॅबचालकांच्या मागण्यासाठी मंत्रालयावर मोर्चाचा इशारा

**पुणे । प्रतिनिधी**

शहरात सुरू असलेल्या बेकायदेशीर कॅब कंपन्यांवर कारवाई करावी आणि खटुवा समितीच्या शिफारशीनुसार कॅबचे दर पत्रक अंमलात आणावे, या मागणीसाठी माँसाहेब कॅब संस्थेच्या वर्षा शिंदे- पाटील यांनी मंत्रालयावर मोर्चा काढण्याचा इशारा दिला आहे.

राज्य शासनाने खटुवा समितीच्या शिफारशीनुसार कॅबविषयी दरपत्रक जाहीर केलेले आहे. सात ते आठ महिने होऊन सुद्धा या जाहीर झालेल्या दरपत्रकानुसार ओला, उबर व इतर ॲप्लिकेशनवर आधारित कंपन्यांनी दर अंमलात आणले नाहीत.

हे दरपत्रक पुणे जिल्ह्यातील प्रवासी वाहतूक ॲप कंपन्यांना लागू करण्यात यावेत आणि पालन न केल्यास त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी संस्थेच्या वतीने मंत्रालयावर नऊ हजार चालक आणि मालक यांचा मोर्चा काढण्याचे नियोजन आहे. दरम्यान, याबाबत परिवहन विभागाचे प्रधान सचिव संजू सेठी आणि पुण्याचे जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांच्यासोबत चर्चा झाली असून, त्यांनी आठ दिवसांचा वेळ मागितला आहे. या मागण्या पूर्ण झाल्या नाहीत, तर कुटुंबासह मुंबई मंत्रालयावर मोर्चा काढू, असे शिंदे- पाटील यांनी निवेदनात म्हटले आहे.

# आमदार सुनिल शेळके यांच्या वाढदिवसानिमित्त महाआरोग्य शिबिराचे आयोजन

पुणे । प्रतिनिधी

मावळचे आमदार सुनिल शेळके यांच्या (चर्रींश्र) वाढदिवसानिमित्त मावळ डेव्हलपमेंट फाउंडेशनच्या वतीने महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शिबिराचे हे सातवे वर्ष असून १९ ते २८ सप्टेंबर कालावधीत सकाळी दहा ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत कान्हे उपजिल्हा रुग्णालय येथे शिबिर होणार आहे. तसेच मावळातील प्रत्येक व्यक्तीपर्यंत या आरोग्य शिबिराचा लाभ मिळावा यासाठी विविध स्तरावर जनजागृती करण्यात येणार आहे.

माय माऊली ज्येष्ठ नागरिक संघ मावळ, श्री विठ्ठल परिवार मावळ, कुलस्वामिनी महिला मंच मावळ या संस्था संयोजन करणार आहेत. शिबिरात एमआरआय तपासणी, सीटी स्कॅन तपासणी, सोनोग्राफी, एक्स-रे, रक्त तपासणी, चष्मे, औषधे, श्रवण यंत्र या सुविधांबरोबरच मोफत रुग्णवाहिका सेवा देखील देण्यात येणार आहे.

शिबिराच्या अंतर्गत हृदयाच्या शस्त्रक्रिया, अन्ननलिका शस्त्रक्रिया. मोतीबिंदू, हाडांचे फ्रॅक्चर, कान - नाक -घसा शस्त्रक्रिया, श्वसनालिकेच्या शस्त्रक्रिया, अंगावरील मोठ्या चरबीच्या गाठीची शस्त्रक्रिया, मणक्याच्या, किडनीच्या, गर्भपिशवीच्या, मुतखड्याच्या, सांध्याच्या, अपेंडिक्सच्या, मूळव्याधीच्या शस्त्रक्रिया, मॅमोग्राफी, हर्निया, पित्ताशय किंवा पित्ताशयातील खड्यांची शस्त्रक्रिया, कॅन्सर संदर्भात शस्त्रक्रिया, गर्भाशयातील गाठींची शस्त्रक्रिया, डोळ्यांचा तिरळेपणा व अन्य समस्यांबद्दल शस्त्रक्रिया, मेंदूच्या आजारावरील (चर्रींश्र) उपचार आणि शस्त्रक्रिया मोफत होणार आहेत. तसेच श्रवणयंत्र, चष्मे, रक्त तपासणी आणि नेत्र तपासणी देखील मोफत करण्यात येणार आहे. यासाठी रुग्णांनी आधार कार्ड, रेशनिंग कार्ड आणि जुन्या आजाराचे मेडिकल रिपोर्ट सोबत घेऊन यायचे आहे.

निरोगी मावळचा संकल्प करणारे हे महाआरोग्य शिबिर गुरुवार दिनांक १९ ते २८ सप्टेंबर या काळात



उपजिल्हा रुग्णालय कान्हे येथे आयोजित केले आहे. एकाच दिवशी गर्दी होऊ नये यासाठी प्रत्येक गावनिहाय दिवस ठरविण्यात आला आहे.

**देहूगाव, इंदोरी, आंबी परिसर**

गुरुवार दिनांक १९ सप्टेंबर रोजी देहू शहर सुदुंबरे, सुदवडी, जांभवडे, इंदोरी, माळवाडी, वराळे, नाणोली तर्फे चाकण, आंबी, वारंगवाडी, नवलाख उंबरे, बधलवाडी, जाधववाडी, परीटेवाडी, मिंडेवाडी, गोळेवाडी, मंगरूळ, शेटेवाडी, कदमवाडी आणि आंबळे या गावांतील नागरिकांनी उपस्थित राहायचे आहे.

**सोमाटणे, बेबेड ओहोळ, चांदखेड परिसर**

शुक्रवार दिनांक २० सप्टेंबर रोजी सोमाटणे, शिरगाव, गहुंजे, साळुंब्रे, (चर्रींश्र) गोडुंब्रे, सांगवडे, दारूंब्रे, कुसगाव, पाचाणे, पुसाणे, दिवड, ओवळे, डोणे, आढले बु., आढले खु., चांदखेड, देवगड, बेबडओहोळ, परंदवडी, धामणे, पिंपळखुटे, शिवणे, मळवंडी ढोरे, थुगाव, आर्डव या गावांतील नागरिकांनी उपस्थित राहायचे आहे.

**वडगाव-कामशेत परिसर**

शनिवार दिनांक २१ सप्टेंबर रोजी वडगाव मावळ, कामशेत, कातवी, जांभूळ, सांगवी, ब्राह्मणवाडी, मोहितेवाडी, साते, कान्हे, अहिरवडे, नायगाव, चिखलसे, कुसगाव खु., खामशेत, टाकवे बु., फळणे, बेलज, राजपुरी या गावांतील नागरिकांनी उपस्थित राहायचे आहे.

**पवन मावळ परिसर**

सोमवार दिनांक २३ सप्टेंबर रोजी उर्से, आढे, ओझर्डे, सडवली, बऊर, येलघोल, धनगव्हाण, शिवली, भडवली, कोथुर्णे, मळवंडी ठुले, वारू, ब्राह्मणोली, गेव्हंडे खडक, ठाकूरसाई, तिकोना, गेव्हंडे वसाहत, जवण १,२,३ अजिवली, शिळींब, वाघेश्वर, कादव, चावसर, मोरवे, तुंग, कोळे, चाफेसर, पानसोली या गावांतील नागरिकांनी उपस्थित राहायचे आहे. (चर्रींश्र)

मंगळवार दिनांक २४ सप्टेंबर रोजी गोवित्री, वडवली, वळवंती, कोळवाडी, भाजेगाव, सोमवडी, शिरदे, आपटी, थोरण, जांभवली, उकसान, पाले ना.मा., करुंज, बेडसे, कडधे, गेव्हंडे, येळसे, शेवती वसाहत, सावंतवाडी, निकमवाडी, प्रभाचीवाडी, धालेवाडी. धामणदरा, मालेवाडी, पवनानगर, काले, आंबेगाव, शिंदगाव, दुधिवरे, लोहगड या गावांतील नागरिकांनी उपस्थित राहायचे आहे.

**आंदर मावळ परिसर**

बुधवार दिनांक २५ सप्टेंबर रोजी नागाथली, वहानगाव, कुसवली, बोरवली, काम्ब्रे आ.मा., डाहुली, बेंदेवाडी, कुसूर, खांडी, सावळा, पाथरगाव, ताजे, पिंपळोली, बोरज, मळवली, पाटण, भाजे, देवले, सदापूर, कार्ला, वेहेरगाव, दहिवली, शिलाटणे, टाकवे खु., फांगणे, मुंढावरे, वाडीवळे, वळक, बुधवडी, संगिसे, वेल्हवडी, नेसावे, खांडशी, उंबरवाडी या गावांतील नागरिकांनी उपस्थित राहायचे आहे.

cmyk